सुख सुखाचं

(निसर्गपर काव्यसंग्रह - भाग ७)

रचना

डॉ. मंजूषा कुलकर्णी

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

पुणे

सुख सुखाचं (निसर्गपर काव्यसंग्रह - भाग ७)
रचना : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

कायमस्वरूपी पत्ता : २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.
प्रकाशक : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
मंजुभारती प्रकाशन
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

प्रथम आवृत्ती : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

अक्षर जुळवणी : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

मुद्रक : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

ISBN : 978-81-995372-5-5

सर्वाधिकार : © लेखिकेच्या स्वाधीन

किंमत : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

मनोगत

मनुष्याच्या जीवनात निसर्ग ही केवळ पार्श्वभूमी नसते. ती जीवनाची साक्षीदार असते. आपण हसतो, रडतो, थकतो, उमलतो आणि निसर्ग प्रत्येक क्षणी आपल्याबरोबर असतो. कधी वाऱ्याच्या झुळुकीत तो आपल्याला हलकंसं थोपटतो, तर कधी पावसाच्या सरींनी आपली हळवी भावना ओढून काढतो. या कवितासंग्रहाचं बीजही अशाच एका क्षणात पेरलं गेलं. ज्या क्षणी मनाला निसर्गाचा स्पर्श झाला आणि शब्द फुलले.

'सुख सुखाच' या शीर्षकात माझ्या लेखनाचा सार आहे. सुख हे बाहेर कुठे नसतं, ते आपल्या मनातल्या शांत कोपऱ्यात असतं. कधी एक फुल उमलताना, कधी एखादं पान गळताना, कधी सकाळच्या सूर्यकिरणांनी अंगावर ऊब द्यावी तसं ते नकळत स्पर्शून जातं. माझ्या प्रत्येक कवितेत तो स्पर्श आहे, कधी निसर्गाचा, कधी भावनेचा, कधी जगण्याचा. या संग्रहातील कविता निसर्गाच्या सौंदर्याचा गौरव करत नाहीत. त्या त्याच्यात जगण्याचं तत्त्व शोधतात. प्रत्येक फुल, प्रत्येक वारा, प्रत्येक ढग काही सांगून जातो. 'थांब जरा, पाहा, ऐका... तुझं सुख इथेच आहे.' आणि ते ऐकताना शब्द निघतात, कविता जन्म घेते. मला नेहमी असं वाटतं की कविता म्हणजे निसर्गाशी संवाद साधणं. आपण प्रश्न विचारतो तो उत्तर देतो, कधी पावसाच्या थेंबात, कधी चांदण्याच्या उजेडात, कधी ओल्या मातीच्या सुगंधात. त्या संवादात जे उमटतं तेच माझ्या लेखणीचं 'सुख' आहे.

'सुख सुखाचं' या नावातली पुनरुक्ती माझ्यासाठी एक जाणीव आहे की सुख आपल्याला पुन्हा पुन्हा सापडतं, जर आपण थोडं थांबलो, आणि मन मोकळं ठेवलं. आपल्या भोवतीच्या सृष्टीत प्रत्येक क्षणी काहीतरी उमलत असतं, फक्त ते पाहण्याची दृष्टी हवी. या कवितांमधून ती दृष्टी वाचकांपर्यंत पोहोचावी आणि त्यांच्या मनातही सुखाचं एक पान उमलावं, हीच या लेखनाची खरी इच्छा आहे. कधी वाटतं, शब्दांनी निसर्गाचं सौंदर्य पकडणं म्हणजे पावसाच्या थेंबाला हातात

धरायचा प्रयत्न, तो थेंब टिकत नाही, पण त्याची थंडी आणि गोडवा मनात राहतो. माझ्या कविता कदाचित त्या थेंबासारख्याच आहेत. क्षणभंगुर, पण स्पर्शून जाणाऱ्या. या प्रवासात प्रत्येक कवितेनं मला स्वतःकडे नेलं. कधी पानांत सळसळणारा वारा झाला, कधी गंध बनून जमिनीत मिसळले आणि प्रत्येक वेळी जाणवलं की सुख हे शोधायचं नसतं, ते अनुभवायचं असतं.

वाचक म्हणून तुम्ही जेव्हा या कवितांच्या ओळी वाचाल, तेव्हा आशा आहे की तुम्हालाही तुमचं 'सुख सुखाचं' सापडेल. कदाचित एखाद्या आठवणीच्या सावलीत, किंवा एखाद्या नव्या पहाटेच्या उजेडात. या संग्रहातून माझा एकच प्रयत्न आहे की शब्दांच्या या लहरीतून तुम्ही निसर्गाचा एक नवा सूर ऐकाल, आणि त्या सुरात तुम्हालाही तुमचं स्वतःचं मन ऐकू येईल.

डॉ. मंजूषा कुलकर्णी

प्रस्तावना

'सुख सुखाचं' या नावातच एक प्रसन्न, उजळलेली पहाट आहे. जणू सूर्यकिरणांच्या उबदार स्पर्शासारखं हे शीर्षक मनात उतरलेलं आहे. डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या या कवितासंग्रहात निसर्ग हे केवळ दृश्य नाही; तो भावनांचा स्रोत आहे ज्यातून उमलतं ते आनंदाचं तत्त्व, जगण्याची निखळ प्रसन्नता, आणि क्षणातलं सौंदर्य. मराठी कवितेत निसर्गावर असंख्य कविता झाल्या, पण 'सुख सुखाचं' या संग्रहात निसर्गाला पाहण्याचा दृष्टीकोन निराळा आहे. इथे निसर्ग दुःख विसरण्यासाठी नाही, तर जगण्याची उब शोधण्यासाठी आहे.

या कवितांमधील प्रत्येक ओळ आपल्याला सांगते की सुख दूर कुठे नसतं, ते आपल्या आजूबाजूला, आपल्या श्वासात, आपल्या क्षणात आहे. डॉ. मंजूषा यांच्या लेखणीत सुख हे मोठं संकल्पनात्मक तत्त्व नाही; ते एका वाऱ्याच्या स्पर्शात, एका पावसाच्या थेंबात, किंवा फुलावर बसलेल्या फुलपाखरात आहे. त्यांच्या कवितांमध्ये आनंदाचा अर्थ भोगण्यात नव्हे, तर अनुभवण्यात आहे. त्या अनुभवाला त्यांनी कधी शब्द दिले आहेत, कधी नुसत्या शांततेने जाणवलं आहे.

'सुख सुखाचं' या शीर्षकात जणू पुनरुक्ती आहे, पण ती साधी पुनरुक्ती नाही. ती अनुभूतीचा अनुनाद आहे. जसं वाऱ्याने पाने हलतात आणि आवाज पुन्हा पुन्हा घुमतो, तसं सुखही आपल्या आयुष्यात परत परत येतं, जर आपण त्याला ओळखायला शिकलो, तर त्याचं अस्तित्व सर्वत्र जाणवतं. हीच या संग्रहाची आत्मा आहे. या कवितांमध्ये कुठे सकाळचं मृदुल प्रकाश आहे, कुठे पावसाची लय, कुठे झाडांच्या सावलीत विसावलेला थकवा, तर कुठे चांदण्याच्या उजेडात हरवलेलं बालमन. निसर्गाच्या या सर्व स्वरूपांतून कवयित्रीने निर्व्याज आनंद शोधला आहे. तो आनंद न विस्फोटक आहे, न गाजावाजा करणारा. तो शांत, स्थिर, आणि हृदयाच्या आतल्या थरांत झिरपणारा आहे.

या संग्रहातील कविता जणू 'क्षणभंगुर आनंदाचे चित्र' आहेत. ज्या क्षणात आपण निसर्गाशी एकरूप होतो, त्या क्षणाचं सौंदर्य कायमचं मनात साठवायचा हा प्रयत्न आहे. कवयित्रीने पानांच्या सळसळीतून, ढगांच्या हालचालींतून, आणि मातीच्या गंधातून आपलं सुख ओळखलं आहे. ती सुखाची व्याख्या बदलते. सुख म्हणजे एखादी घटना नाही, ते एक स्थिती आहे जिथे मन शांत असतं, आणि आत्मा खुला असतो.

'सुख सुखाचं' या संग्रहात निसर्ग कवयित्रीचा मित्रही आहे आणि आरसा देखील. तो तिचं मन दाखवतो. जेव्हा ती आनंदी असते, तेव्हा आकाश उजळतं; जेव्हा ती शांत असते, तेव्हा वारा मंद होतो; जेव्हा ती हसते, तेव्हा फुलं उमलतात. या कवितांमध्ये त्या समरसतेचा अनुभव मिळतो. जिथे माणूस आणि निसर्ग यांचं अस्तित्व एकरूप होतं. या संग्रहाचं एक विशेष सौंदर्य म्हणजे त्याची साधेपणा. डॉ. मंजूषा यांनी निसर्गाच्या लहानशा गोष्टींमधून मोठा अर्थ शोधला आहे. त्या एखाद्या फुलाकडे पाहतात आणि म्हणतात – 'तू गळलंस, पण तुझा सुगंध टिकला.' किंवा पावसाच्या थेंबाला विचारतात – 'तू गळलास का, की धरतीने तुला मिठी मारली?' या प्रश्नांमागे जीवनाचा अर्थ दडलेला आहे. तेच या कवितांचं सौंदर्य आहे की त्या वाचताना आपल्याला स्वतःचं मन निसर्गात विरघळल्यासारखं वाटतं. या कवितांचा गाभा म्हणजे 'सुखाचं तत्त्वज्ञान.' सुख हे मागायचं नसतं, ते जाणायचं असतं. ते आपल्यातच आहे, जसं बीजात झाड लपलेलं असतं. कवयित्रीने त्या बीजाला शब्दांनी पाणी दिलं आहे आणि म्हणूनच 'सुख सुखाचं' हा संग्रह वाचताना आपल्याला आतून उजेड मिळतो, एक प्रसन्न हसू उमटतं, आणि मन हलकं होतं जणू आपण स्वतःला पुन्हा शोधतोय. ही कविता निसर्गाशी नातं जोडणारी नाही, तर निसर्ग होण्याचा अनुभव देणारी आहे. वाचकाला तिच्या शब्दांतून एक वेगळी प्रसन्नता लाभते जी थेट अंतर्मनाशी बोलते.

'सुख सुखाचं' या नावातल्या साधेपणात एक गूढ गोडवा आहे. तो गोडवा हृदयात झिरपतो, आणि दीर्घकाळ टिकतो. हीच या संग्रहाची खरी कमाई आहे.

सौ. मीरा सामंत

अनाम प्रेम

गोवा

अनुक्रमणिका

१) तप्त झळा मातल्या ... ११
२) प्राण येती तरारून ... १२
३) मन हिरव्या क्षणांचे ... १३
४) झाड अंगणात माझ्या रंग रंग रंग झाले ... १४
५) वासंतिक राग ... १५
६) असा अनोखा जगू या ग्रीष्म हा ... १६
७) अशी चैतन्ये पसरून जाती ... १७
८) गंगा भागीरथी म्हणावे ... १८
९) दूर त्या तिथे ... १९
१०) घर आपुले ... २०
११) शालीमधल्या आठवणीतून ... २१
१२) मन मोहरून माझे जाते ... २२
१३) गाव तोच रेखावा ... २३
१४) लावण्ये घडविले ... २४
१५) पापणी कोरली येथे ... २५
१६) मधे वाहते जीवन सरिता ... २६
१७) इथे विसावती कला ... २७
१८) बीज अंकुरे अंकुरे ... २८
१९) नयनसूख कोणते कळावे ... २९
२०) दिशा उजळता ज्योती पसरते ... ३०
२१) वसुंधरा यौवनात ... ३१
२२) घर वेगळे नकोच सजणा ... ३२
२३) प्रभातवेळी किरणशलाका ... ३३
२४) काही कवडसे ऐसे ... ३४
२५) ही पाण्याची कहाणी ... ३५
२६) खडक कुरूपसा वाटे तरीही ... ३६
२७) बिंब असते मूळ हे ... ३७
२८) तेजोमय गोलक डोकावे ... ३८
२९) मोहरल्या आंब्याचा सुवास दरवळतो ... ३९
३०) की जांभळाचा रस मधुरसा ... ४०
३१) गवतफुलांच्या स्मृती ठेवू या ... ४१
३२) निसर्ग वारा पाऊस पाणी ... ४२
३३) पाऊसधारा ओलित वारा ... ४३
३४) स्मृती ओलसर उरते ही ... ४४
३५) ही बाग जांभळी जी ... ४५
३६) ऋणानुबंधांचे बंध अगणित ... ४६
३७) उत्सव रम्य पहावा ... ४७
३८) परमेशा, अगणित तू उरशी ... ४८
३९) सांज आठवे ना साधी ... ४९
४०) सुरम्य जगणे दिसावे ... ५०
४१) आली पहाट सुंदर ... ५१
४२) नदी गीत गाताना ... ५२
४३) विरंगुळा ... ५३
४४) रोज ऊन्हं सांगा बरे ... ५४

४५) हिमाचली सार्थकत्व ... ५५
४६) तिची दिवाळी
ऋतूऋतूंची ... ५६
४७) आजची नवी पहाट ... ५७
४८) फुलण्याचं सुख मोठं ... ५८
४९) खळी नवेली
अजून खुलली ... ५९
५०) ओल्या खुणांचे
उरती ठसे ... ६०
५१) भारलेली रातराणी ... ६१
५२) जीवनाची रीत ही ... ६२
५३) धुक्या धुक्यावर
धुकटशी रेघ ... ६३
५४) नभ गाभूळ होताना ... ६४
५५) ऋतू भावनांचे येती ... ६५



(१)
तप्त झळा मातल्या

तप्त झळा मातल्या
ओकतात आग ही
भुईमध्ये दबलेल्या
उष्म्याला जाग ही

सकाळीच तापतो
तळपतो मार्तंड
राग त्याचा अनावर
ताप वाटे प्रचंड

गरमीचा उच्चांक
अंगी लाही लाही
जीव असो कोणताही
ओरडतो त्राहि त्राहि

दोष निसर्गाचा ना
मानवाचा आहे हा
तोडुनिया जंगलांना
प्रगतीला पाहे हा

घालविली हिरवाई
संकटात धरती आई
आपल्याच विनाशाची
माणसा तुला का घाई

दि.२४/०४/२०२४
रात्री ०८.०३ वा.

(२)
प्राण येती तरारून

असे वाटते रमावे
शांत सृष्टीत कधी ते
एकटेच नको कोणी
रव ऐकावे आधी ते

स्पर्श गारवे जळाचे
चरणांशी रुळताना
जरा भेटावे स्वतःला
स्वतःशी जुळताना

दूर डोंगराशी जावे
उंचावरून जोखावे
खाली धरेची ती खोली
वर अंबर झोकावे

तिथे उगवतो रोज
दिनमणी न चुकता
घ्यावे पाहून तयाला
लावण्य ते न हुकता

आकाशात केशराचे
मळे खुलवतो कोण
रंग टिपून मनाशी
विसावावे क्षण दोन

अशा चैतन्याच्या घ्याव्या
भरभरून त्या गोण्या
आठवाव्या स्मृती पुन्हा
उदासल्या राती कोण्या

जाई मळभ सरून
प्राण येती तरारून
झटकन एकरूप
व्हावे पट ते सारून

दि.१७/०४/२०२४
सकाळी ०६.११ वा.



(३)
मन हिरव्या क्षणांचे

आस हिरव्या तळ्याशी
काठ हिरवे भरले
तृण ताजे हिरवाले
हिरवाई पांघरले

झाडं हिरवे हिरवे
वेली हिरव्या बरव्या
कलिकाही हिरव्याशा
हासू गोडाले झरव्या

लाटा हिरव्या हिरव्या
वाटा हिरवाईतल्या
पायी रेशीम हिरवी
माया मिरवाईतल्या

झाडी हिरवीगार ती
हिरवली गार हवा
पाचू ओसरले किती
रंग हिरवार नवा

नभ हिरवुसलेले
जळ हिरव हिरवे
भुई हिरवी तरवी
सुख हिरवे मिरवे

घरकुल हिरव्याशा
ह्या भऱ्या स्वप्नांचे
घरदार हिरवाळ
मन हिरव्या क्षणांचे
मन हिरव्या क्षणांचे....

दि.१२/०४/२०२४
सकाळी ०८.११ वा.

(४)
झाड अंगणात माझ्या
रंग रंग रंग झाले

रंग भरले आकाशी, तरुवर पसरले
इंद्रधनू का देवाचे धरणीशी विसरले

झाड अंगणात माझ्या रंग रंग रंग झाले
त्याची खोडे पाने फुले रंग रंग रंग झाले

आज मन पंचमीला रंग होत उधळले
वृंदावनी राधा आणि श्याम रंगरंगाळले

कुठे कुठे रंग कसे सांगू रंग हरिसंग
रंग रंग अंग मन मन दंग असे रंग श्रीरंग

जन्म भरे रंग उमंग सूर रंग गीतरंग
रंग माझा रंग तुझा रंग त्याचा एकरंग

दि.३०/०३/२०२४
रात्री ०८.५९ वा.

(५)
वासंतिक राग

कुहुकुहू सुरात येते जाग
गा कोकीळ वासंतिक राग
फुलली पाने कळ्या उमलल्या
बहरते मनी प्रीतीची बाग

स्वच्छ सकाळी स्वच्छ नभातून
खगमाळांच्या रांगा उडती
यौवनातल्या गुजगोष्टींनी
पानोपानी कलिका दडती

झुळूक हवेची शीतल येते
थंडावा जगण्याला देते
सुगंध सारे वाऱ्यावरती
अत्तर कुपी उघडूनिया जाते

बने मोगऱ्याची खुलून हासली अन
तिथे जाग गुलमोहराला आली
नभी रंग येती नव्याने नवेसे
नवी दृष्टी सृष्टीत डुंबून गेली

मला वाटते जन्म येथे रूळावा
मधुमास हृदयात ऐसा फळावा
फुलांच्या परागात लपले जे भाव
तुलाही असा भाव सहजी कळावा

दि.२७/०३/२०२४
सकाळी ०८.३८ वा.

(६)
असा अनोखा जगू या ग्रीष्म हा

सरस तीरावर गुलमोहराची
वाट किती देखणी
टाकत अलगद पाऊल त्यावर
स्वप्नांची रेखणी

लाहीलाही होते उन्हाने
ग्रीष्माची काहिली
तशात येथे तुझी राजसा
स्मृती जळी राहिली

थंडाव्याची रम्य ठिकाणे
सोबतीने चालली
तूही प्रीतीने मज केसांतुन
मोगरी जी माळली

कुठून एवढी उमेद येते
रखरखणाऱ्या उन्हात
जाळतो शोषतो सुकवतो ऋतू जो
तरी पालवी मनात

जळात शीतल सुवास भरले
सुगंध पुष्पातुनी
परिमळणारा वारा वाहतो
रानारानातुनी

नौकाविहारा येई प्रियवरा
तुषार दे उडवुनी
असा अनोखा जगू या ग्रीष्म हा
आठवास घडवुनी

दि.१९/०३/२०२४
रात्री ०७.४१ वा.

(७)

अशी चैतन्ये पसरून जाती

कुणी न पाहती वनी काननी
उमलून आल्या फुला
ते तर झुलती स्वानंदाचा
आनंदाने झुला

हळूच येते झुळूक गारवी
थंड थंड वाहते
वेलीवरूनी कळी कळुली
वाकून मग पाहते

रंग उमलती सारे सुंदर
खुलवून दे परिसरा
त्यातच येतो लाडिक वाहत
अवखळसा का झरा

मधेच उडती गोड गोडुली
नाचरी फुलपाखरे
वाचून घ्यावी पंखांवरती
रंगमोह अक्षरे

अशी चैतन्ये पसरून जाती
क्षणोक्षणी त्या तिथे
दोन फुले मज मनी उमलती
स्वप्नी रमते मी इथे

दि.१४/०३/२०२४
रात्री ११.२० वा.

(८)
गंगा भागीरथी म्हणावे

निळीशार नागमोडी वाहते
सागरगामी सरिता
स्वर्गातून अवतरली गंगा
भूतली प्रेमाकरिता

मजेत वहाते सुरेल गाते
खळखळते ती धुंद
प्रवाह वाहतो हिमालयातून
भेटीसाठी बेधुंद

वाटेमधल्या हिरवाईचे
स्वप्नं हिरवे करताना
ओंजळीत ती मावून जाते
तृप्ती पुरी भरताना

सामावून घेताच आपुली
केलेली प्रार्थना
पावन करते जलबिंदुंनी
भक्तांची अर्चना

भगीरथाच्या यत्ने आली
भूवरी अवतरली
भूमी विपुला तिच्यामुळे की
भाग्यशाली ठरली

तिच्या तिराला शीतलतेचा
गंध तपाचा येतो
ऋषी मुनींच्या उपासनेला
मधुर फळेही देतो

गंगा भागीरथी म्हणावे
तुजला मनोभावाने
ओळख तुझी ग संस्कृती झाली
पवित्रता नावाने

दि.०४/०३/२०२४
रात्री ०९.२१ वा.



(९)
दूर त्या तिथे

सौंदर्याची शिखरे सुंदर
लावण्याची वाट
उमलून आल्या केशराचा
सोनकेशरी थाट

चढत्या सोपानांनी चढती
ओढ चढावी इथली
सत्य असे की स्थळी ही मोहक
माझ्या स्वप्नामधली

पायाखाली स्पर्श मल्मली
हर्ष कोवळे खुलती
झाडे वेली पाने फुले ही
पुन्हा नव्याने भुलती

कुंपण वेडे शिस्तीमधले
स्वतःस राखून देते
मनातल्या मनी रंग प्रीतीचे
अंगी माखून घेते

दूर त्या तिथे पहाट थोडी
धुक्यात रेंगाळलेली
गिरीवर शिखरी निशा निळाई
अजून पेंगुळलेली

तशात वाटे हात तुझा मज
हाती घट्ट असावा
साखरझोपेमधेही अवखळ
राजस दूर नसावा

दि.०३/०३/२०२३
पहाटे ०५.५७ वा.

(१०)
घर आपुले

कधी होईल घर आपुले
अशा हिरवाईच्या कुशीत
जिथे वाहे खळाळून
झराही स्वतःच्या खुशीत

उन्हांची रांगोळी पडते
घराच्या अंगणी अवखळ
झुळूक वाऱ्याची वाहत ये
सतत गुणगुणणारी चंचल

असा झरतो हा पाऊस बघ
मला भिजवून जाताना
हळूच मैनाही फांदीवर
निरखते मजसी गाताना

झावळ्या झाडांच्या येती
वाकुनी सावली द्याया
छतावर साळुंक्या जमती
झिम्मा फुगड्या खेळाया

सांजेला घरट्यात किलबिल
पिलांना भेटते माय
तुझेही त्याचवेळी रे
घरकुली वळती बघ पाय

मी पडवीत वाट पाहणारी
तुझ्यासाठीच थांबेन
प्रीती पाहून आपुली रे
रातही रोजच लांबेल

नभातील चांदण्या येती
रातीला खाली उतरून
गोडी नात्याची पाहून
किती जातील रे हरखून

घरातील कोन्याकोन्यात
गंधाळून वावर जातील
हिरव्या सृष्टीने गाणी
प्रीतीची बहरा येतील

दि.०२/०३/२०२४
सायंकाळी ०५.२५ वा.

(११)
शालीमधल्या आठवणीतून

खळखळ खळाळणाऱ्या झऱ्या
तुझे वाहणे शांत
धुक्यात झाडेवेली हरळी
मौन थिजली निवांत

पानापानावरून शिरशिरी
हुडहुडणाऱ्या कळ्या
फुले थांबली जरा फुलाया
शीतशरदी आगळ्या

घरट्याध्ये पंखाखाली
पिले ऊब पांघरली
गवतावरती कुणी इथे ही
थंडी कडक अंथरली

पाण्यावरती होऊन स्वार हा
पवन होई शीतल
अजून झोंबतो कणाकणाला
कुडकुडते ती कळ

परस्परांना बोलू न शकती
ध्वनी गार गारठले
आखडून गेल्या तनुवर शैत्य
अजून किती तारठले

असा हा ऋतू कुडकूड करतो
तरी हवा वाटतो
शालीमधल्या आठवणीतून
मनी परी दाटतो

दि.२६/२/२०२४
रात्री ११.४८ वा.



(१२)
मन मोहरून माझे जाते

जळी सांडल्या तेजबिंबाबस पाहू
सकाळी जरा तेजसहवासी राहू

तिथे तो उगवतो दिशा प्राची होते
चैतन्य लहरी हवा खासी होते

फिरतो असा कुंचला वर्ण भरला
हातात सविता जणू त्याने धरला

धरेवर सरोवर खुशालीत राहते
पहाटेस आकाश प्रतिबिंब पाहते

जरी रोजचे दृश्य अनमोल होते
दरदिवशी मन मोहरून माझे जाते

असे वाटते रोज मिळतो नव्याने
मला जन्म देवा पुन्हा रे नव्याने

दि.२०/०२/२०२४
सकाळी ०६.३२ वा.

(१३)
गाव तोच रेखावा

आठवणींच्या हिंदोळ्यावर
झुलते मन माझे
कुठे राहते कुणास तगाउक
ना सोबत तनमन माझे

तिथल्या डॉगर दऱ्या दुशालीत
हिरवाईच्या दंग
एक मनाला चढत जातसे
उत्साहाचा रंग

वाट मोकळी जराजराशी
ओली ती हो चिंब
माणसातल्या माणुसकीतून
निखळ मनाचे बिंब

सान झोपड्या अथवा राहोट्या
कुट्या काड्याकुड्यांच्या
आनंदातून डोलत जातील
तृषा कधी न माड्यांच्या

परतून आले शरीर तिथुनी
काळीज परतत नाही
थोडेही त्या सृष्टीमधुनी
वेडे सरकत नाही

जणु राहतो खोल तळाशी
हृदयाच्या देखावा
जरी एकटी मनात माझ्या
गाव तोच रेखावा

दि.१०/११/२०२४
सकाळी १०.०४ वा.

(१४)
लावण्ये घडविले

पावसाळ्यातील सरी सराव्या
ओल्या रस्त्यातून
पसरून जावे धुके धुकेसे
काय दिसे त्यातून

गर्द केशरी पानांवरती
थेंब घसरती जेव्हा
पाने ओघळून येती खाली
अलगद ओली तेव्हा

दुरदूरवर कुणीच नाही
कुणीच सोबत येथे
तरी मनाने पुन्हा पुन्हा का
रमण्या जावे तेथे

ओल्या थांबांच्या ओळीतूम
पाऊस लिहितो गाणी
आपण पाहतो झरझर आले
मेघातून हे पाणी

सूर तयाचे मल्हारी ते
ताना टपटपताना
उंच कधी तर कधी खालचे
अवरोह आरोह घ्या ना

काळ्या काळ्या सडकेवरती
दर्पण कुणी ठेविले
पहा स्वतःच्या प्रतिबिंबाला
लावण्ये घडविले
तयाने लावण्ये घडविले

दि.१४/११/२०२४
सकाळी ०९.१२ वा.

(१५)
पापणी कोरली येथे

ही पुष्पराणी नाव पापणी
कोरीव डोळ्यावर
जणू लवलेली मदनपापणी
मोहित नयनावर

निळे जांभळे डोळे पाणीदार
विशाल लोचनदल
उघडझाप चालते निरंतर
रमणीची चंचल

काय पाहते कुणास ठाऊक
रानोमाळी राणी
तिच्या भोवती फूलपाखरे
गाती सुंदर गाणी

त्या नेत्रांवर अलगद कोणी
चुंबन का दिधले ते
लाजून लाजून गेली मिटुनी
डोळे गूज वदले ते

आता कोणी येईल रसिक नि
बुडून जाईल तेथे
अशी साजरी किती लाजरी
पापणी कोरली येथे

दि.२३/११/२०२४
रात्री ११.४३ वा.

(१६)
मधे वाहते जीवन सरिता

संथ वाहत्या नदीस येथे
भेटतो की नगराज
पाहून तन्वी अवखळ चंचल
लेई हिरवा साज

गर्द हरित एका काठावर
निवांत पहुडले डोंगर
जणू वयस्कर कुणी घरातील
नजर ठेविती चहुवर

दुसऱ्या काठावरी तारुण्ये
मुसमुसलेली सृष्टी
हिरव्या पोपटी कवळ्या तृणांची
रसरसलेली दृष्टी

एक ऐलतीर आयुष्याचा
कळ्या भरलेल्या कवळ्या
एक पैलतीर जरठ पानुल्या
गळणाऱ्या झावळ्या

मधे वाहते जीवन सरिता
दो काठांची धारा
उदयाचली वा अस्तालाही
देत राहे सहारा

दि.२४/११/२०२४
सकाळी ०८.२७ वा.



(१७)
इथे विसावती कला

मेघ पांघरले कुणी
नग कळस दिसेना
नभ गुडूप झाले हो
कुणा कुठे गवसेना

कुणी हिरवी पोपटी
सांगा दुलई घेतली
आत दडून कुणी हो
पाचू माळ ती वेचली

तरुवर एकटाच
उभा शांत नि निवांत
त्याची सावली खेळते
ऊन सावल्यांचे भ्रांत

इथे गुंजते कुणाचे
फक्त एकाऽऽकीपण
नसे आवाज रवाचा
मूर्त एऽऽक टाकीपण

इथे विसावती कला
इथे चित्र रंगतात
रसिकांसवे नित
कलाकार दंगतात

दि.०१/१२/२०२४
सकाळी ०८.५७ वा.

(१८)
बीज अंकुरे अंकुरे

बीज अंकुरे अंकुरे
आस उभरून येता
आत भुईच्या कुशीत
रोप तरारून जाता

काय सांगते ती माती
जप बाळा नातीगोती
पानं फुलं कळ्या शाखा
भार कधीही ना होती

होत जाईल विस्तार
मुळं माझ्याशी जोडली
जर असतील सदा
कुणी कितीही तोडली

पुन्हा होईन मी माता
संजीवन स्तन्य देता
पुन्हा पुन्हा नवनवी
संतती की जन्म घेता

आत खोल रुजलेले
धागे स्नेह भरलेले
बंध घट्ट अंतरीचे
शब्दातीत ठरलेले

दि.१२/१२/२०२४
सकाळी ०९.३८ वा.

(१९)
नयनसूख कोणते कळावे

पिवळ्या धम्मक रंगामधली
उधळण पाहून घ्यावी
नयनसूख कोणते कळावे
मरगळ झटकून जावी

ही पाने की फुले उमलली
तरुवर कांचनपेठा
कुण्या अप्सरेचा हा वाटे
भूवर आला हेका

तिच्या आभूषणसेवेसाठी
सुवर्णतरु साकारे
येथून वेडावून सोनेरो
होत वाहती वारे

क्षणात वाटे कुणी उधळला
भंडारा उत्साहे
मनात काही आशा आणिक
स्वप्नं सुंदरी राहे

जरा विसावून मनात आता
सोन्याच्या आठवणी
पुन्हा पुन्हा मग करीत जावी
येथ मना पाठवणी

दि.३१/०१/२०२५
रात्री ११.३२ वा.

(२०)
दिशा उजळता ज्योती पसरते

लाल लाल मनमोह रक्तिमा
सुंदर शोभा सूर्याची
रोज प्रभाती उधळण होते
अनंत असल्या तेजाची

कळ्या उमलती फुले डोलती
चैतन्याची पखरण
दिशा उजळता ज्योती पसरते
नित्य नवी प्रभा पसरण

रोज निशेला जाग्या होती
अंधाराच्या त्या राण्या
रविकिरणांच्या उगवणी संगे
निद्रा आळवती गाण्या

कोण सकाळी दे संदेशा
उठा उठा हो जागे व्हा
दिनचर्येच्या आरंभाला
ईशस्मरणी दंग रहा

कर्म करावे असे अखंडित
रविराजा जसे नियमित
कोण थांबवू शकेल कीर्ती
लाभेल ख्याती जी अमित

दि.०३/०२/२०२५
सकाळी ०८.४२ वा.

(२१)
वसुंधरा यौवनात

वसुंधरा यौवनात
येते वसंतात ती भरात
कुहू कुहू कुजन करून कोकीळ
गाईल मधुर स्वरात
नवीच स्वप्ने जागी मनात
येते वसुंधरा यौवनात...

नव्या पालवीसंगे फुटतील
कोंब नव्याने धरतीला
रंग आगळे ढंग वेगळे
चढतील गंधित मातीला
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

परिमळ सुंदर पसरून जातील
फुले दिव्यशी उमलून जातील
नवी चेतना नवी प्रेरणा
नव आकांक्षा ह्रदयी राहतील
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

हिरवा हिरवा कंच शालू ती
अंगावरती लेऊन शोभे
ऋतुराजाच्या आगमनाने
लहर चैतन्याची गाजे
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

मऊमऊ हिरवा दिसे गालिचा
हरिततृणांच्या मखमालीचा
पाचू सांगा कुणी अंथरले
सूगंध हुंगुन घ्या मातीचा
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

दि.०४/०२/२०२५
सकाळी ०४.५८ वा.

(२२)
घर वेगळे नकोच सजणा

निसर्ग देतो साद मागतो
प्रतिसादाला आपुल्या
जीवन करतो सुरम्य सुंदर
गोष्टी देऊनी भल्या भल्या

रंग पिसारे खुलवून सारे
रंग रंगीले करतो स्वप्ना
कधी वाटते आई तो तर
कधी बाप कणखरसा कणा

जलतरंग उठतात हलकेसे
हलक्या हलक्या सरी बरसती
चातक वेडे प्रेमापोटी
मेघधारांसाठी तरसती

गवतावरच्या फुलराण्यांशी
हितगुज साधून घ्यावे थोडे
फूलपाखरांच्या संगे मग
गुंजन व्हावे गोडे गोडे

घर वेगळे नकोच सजणा
इथेच राहू कुशीत सृष्टीच्या
फिटतील साऱ्या पारणवेळा
नव्या उघडतील झडपा दृष्टीच्या

दि.०८/०२/२०२५
रात्री ११.३४ वा.



(२३)
प्रभातवेळी किरणशलाका

प्रभातवेळी किरणशलाका
येतील बघ भूवरी
स्वर्ग सापडे तेजामधुनी
हर्षित हो शर्वरी

झाडावेलींच्या गाळणीतून
गाळून येतो रवी
नव्याच ढंगामध्ये उजळते
अंधारी ही अटवी

हास्य उमटले जणू इंद्राचे
की चांदणे चंद्राचे
जरा उजेडी वातावरणी
गगनी रंग मंद्राचे

निळसर सुंदर छटा पसरती
मन निळसर जणु श्याम
रोज सकाळी येशील सखया
होऊन तू अभिराम

एक प्रेरणा एक चेतना
कुणी पाठवली पहा
सौंदर्याची परिभाषा ही
लोभसवाणी अहा

दि.१५/०२/२०२५
सकाळी ०७.४२ वा.

(२४)

काही कवडसे ऐसे

रोज येऊ दे घरी कवडसा
हलकासा तेजस्वी
परलोकातून दिव्यत्वाची
प्रचिती जणु ओजस्वी

तेच रोजचे घर जे आपुले
उजळून चकाकते ना
एक प्रेरणा जगण्यासाठी
देऊन लकाकते ना

देह घराच्या खिडक्या बुद्धीच्या
जरा उघड्या ठेवाव्या
अंतःप्रकाश देई कवडसे
ज्योती किती तेवाव्या

त्याच प्रकाशातून सापडे
कांती नवी उजळती
नवीच आशा नव परिभाषा
नवोन्मेषही फळती

हृदयामध्ये जतन जपावे
काही कवडसे ऐसे
जणू मिटताना उमलून यावे
पंचप्राणांनी तैसे

दि.०१/०४/२०२५
सकाळी ०७.३२ वा.

(२५)
ही पाण्याची कहाणी

थेंबाथेंबातून जन्मतो
जीव नवा जणू जेथे
इतुकी शक्ती निसर्ग देतो
जपणे त्याला येथे

थेंबे थेंबे तळे साचते
सुख जगण्याचे लाभे
जल हे जीवन चैतन्याचे
गोड रूप ते राजे

हिरवाईच्या आतून दडली
किती पोषणे त्यात
ब्रह्माण्डाची उत्पत्तीही
सामावली हो जलात

जीव जन्मतो जळात कणभर
मरता घशात पाणी
जगण्या मरण्यासाठी कारण
ही पाण्याची कहाणी

चला वाचवू जीवन आपुले
शुद्ध ठेवणे त्याला
अमृत कोणी इथे प्राशिले
घ्या जल भरला प्याला

दि.०२/०४/२०२५
सकाळी ०९.०६ वा.



(२६)
खडक कुरूपसा वाटे तरीही

कधी वाटते खडक होऊनी
निश्चल मी थांबावे
कुणी कुणाचे गुपित हलकेची
मजजवळी सांगावे

युगायुगातून वाहत सरिता
जवळून खळखळ जावी
आधाराने माझ्या ती ही
प्रवाह घडवीत यावी

अवती भवती तृणांकुरे ही
उगवून डोलत रहावी
दुरून का होईना परी डोंगरं
साजरी कुणी पहावी

वरवर पाहून ओबडधोबड
कणखर कठोर वाटे
आत एक ओलावा निर्झर
काळजात मज दाटे

कधी पाहिले आहे का तुम्ही
आत कोंब रुजलेला
इवल्या इवल्या अंकुराने मग
खडक पहा सजलेला

पचवून लाव्हा गिळुनी क्रोधा
तप्त शांत मी होई
खडक कुरूपसा वाटे तरीही
मन सुंदर कुणी पाही

म्हणून म्हणतो खडक होणे हे
नाही सोपे काही
अविचल अविरत सुस्थिर राहणे
जमते का ते पाही

दि.०४/०४/२०२५
रात्री ११.५९ वा.



(२७)

बिंब असते मूळ हे

कुठे पाहू खरे बिंब की
जळात पडले प्रतिबिंब रे
कधी कधी सौंदर्याने
बिंबापेक्षा सरस प्रतिबिंब रे

घडते की जे हे असे
निज संततिही हो दिसे
सरस आपुल्यापेक्षाही ती
ठरते कितीदा पहा तसे

चित्रकाराच्या मनी
उमटून येई चित्र जे
कागदावर जे उतरते
सुंदरसे सुचित्र ते

रूप रामकृष्णाचे बाल हे
पाहता सुख लोचनी
काव्य जन्मे जरी मनी परी
माधुरी ये वाचनी

एक ध्यानी नित वसो परी
बिंब असते मूळ हे
कितीही असले सरस तरी
प्रतिबिंब नसते मूळ हे

दि.०८/०४/२०२५
सकाळी ०८.१४ वा.

झाडाझाडातून तेजोमय
गोलक डोकावे
दिवसभराच्या उत्साहाचे
गमक हे फोफावे

तुला पाहता जगावे असे
रोज नवे वाटे
अंधाराचे निराशेचेही
जाळे त्वरित की फिटे

दैव उगवते तुझ्याच रूपे
स्वर्णमयी कांती
शिकवण देतो तू देवा करा
नियतसी भ्रमंती

(२८)
तेजोमय गोलक डोकावे

असा उगवला तू नारायण
जीवन नव दिधले
प्रकाश ऊर्जा देवस्वरूप तू
दृग्गोचर झाले

तुझ्यासारखे कर्म घडावे
तेज पसरता यावे
सद्कर्माने तम सारे बघ
दूर सारता यावे

दि.१३/०४/२०२५
सकाळी ०८.४२ वा.



(२९)
मोहरल्या आंब्याचा सुवास दरवळतो

ऋतुराज येतो अन मोहरल्या
आंब्याचा सुवास दरवळतो
इतका मादक असतो तो
की मदनबाण का,
ते हुंगल्यावरच कळतो

मग कोकिळेचे कूजन सुरू होते
आणि आम्रतरूवर
इवलासा अंकुर डोकावतो
कैऱ्यांच्या हिरवाईतला
फळांचा राजा फोफावतो

हळूहळू कोय धरू लागते
ती इटुकली कैरी
अवकाळी वारा पाऊस न ठरो
तिच्यासाठी वैरी

मग काय बघावे वयात येतानाचे
तिचे रेखीव आखीव कोरीव रूप
कवळी कच्ची असताना ती ती असते
कुठून तिला मिळते बरं
त्याचे आंब्याचे स्वरूप

मग पाडाला पिकलेल्या त्या कैरीची
आंबट गोड चव
जिभेवर अशी काही रुळते
वर्षभर वाट पाहून तरसलेली रसना
त्या स्वर्गीय गोडीने फळते

आमराई असो घरात पिकत घातलेली
आंब्याची वाडी असो
नुसता घमघमाट मधुर मंजु रसाचा
सारा ग्रीष्म सुखात वसो

दि.२९/०४/२०२५
रात्री ११.४३ वा.

(३०)
की जांभळाचा रस मधुरसा

इतका गोड फिका जांभळट
रंग अंगी ल्यालात ग
की जांभळाचा रस मधुरसा
पोटभर तुम्ही प्यालात ग

नजर टाकताच किती
हव्याशा वाटता तुम्ही
नजरेने मनाच्या कलशाने
प्याव्याशा वाटता तुम्ही

कित्ती कित्ती तलम ग
माझ्या मनाच्या पदरांसारख्या
फुलता सुकता माझ्या
भावफुलांसारख्या

तुमच्या कानात सांगू
का ग मनातलं गुज
तुमचं माझं चालत राहू
देत गुपचूप अलगुज

कधी वाटतं कधीतरी
तुम्ही माझं रूप घ्यावं
मी तुमची जागा घेत
वेलीवर डुलत रहावं

दि.०२/०५/२०२५
सायं. ०६.५३ वा.



(३१)
गवतफुलांच्या स्मृती ठेवू या

गवतफुलांच्या बहाराकडे का
लक्ष देते कुणी
स्वच्छंदी ते डोलत जाते
पाहो न पाहो कुणी

असे झाले जर असते मानवा
तुझ्या संगती रे
किती दुःख अन किती वेदना
जीव टांगती रे

इतरांकडूनी वाहवा मिळो वा
मिळतील नावे बोटे
त्यावर अवलंबून आपुले
सुख दुःख हे सारे खोटे

जन्मा आलो फुलणे सुकणे
नित्य नियतीने ठरले
कशास सारे सोडून आपण
नको ते गठडी भरले

कुणी तुडवती तरी न अडती
उमलून येती फुले
तुच्छ तृणांकुर तुच्छ त्याहुनी
लेखती गवतफुले

चला होऊ या आणि जगू या
जरा आपुल्यासाठी
गवतफुलांच्या स्मृती ठेवू या
सदैव आपुल्या गाठी

दि.०८/०५/२०२५
रात्री १२.३६ वा.

(३२)
निसर्ग वारा पाऊस पाणी

निसर्ग वारा पाऊस पाणी
बहरून येते सुंदर धरणी
कुठे जळांचे दर्पण नितळसे
कुठे ईश्वरी रम्य ही करणी

रंग फुलांचे कुणी सांडले
किती मांडले नित आकार
एक एक बघ पर्ण होतसे
सौंदर्याने मग साकार

हसता वेली फुले नाचती
आणि फळांच्या जाती लगडती
कुठे निशेची सुरम्य स्वप्ने
कुठे प्रत्युषा नव्या उजडती

कुठे चांदण्या लुकलूक करुनी
मिचमिच डोळे देती दिपवुनी
कुठे चंद्रमा जलदा आडुनी
प्रीत पेरतो गुज लपवुनी

आकाशाने झुकता खाली
क्षितिजापाशी मीलन होते
धरती आणिक नभांगणाची
प्रेम कहाणी पसरत जाते

दि.२२/०५/२०२५
सकाळी ०८.०९ वा.

(३३)
पाऊसधारा ओलित वारा

पाऊसधारा ओलित वारा
गंध मातीचा दरवळतो
जलधारांनी आस बरसावीत
पाऊस मजसी का छळतो

पानेपाने दवात भिजती
तरारून उठते माती
आकाशाशी धरतीवरूनी
ओलाव्याची ही नाती

जसा वेडावून बरसून जातो
तसे भेटावे वाटे कुणी
ओल्या मिठीच्या खुणाही ओल्या
ओल्या भावनांना वेचुनी

मनात नाचून जातो मोरही
फुलती पिसारे रंगाचे
पाऊस येता मन बागडते
शहारलेल्या अंगाचे

तुझ्या धारेतून तुझ्या थेंबातून
मोहरून मन बावरते
तुझे बरसणे देई दिलासे
तप्त झळांतून सावरते

दि.२७/०५/२०२५
सकाळी ०९.०२ वा.

(३४)
स्मृती ओलसर उरते ही

थेंब जळाचा मोती टपोरा
फळावरी जो आहे थवकला
गळण्याआधी ढळण्याआधी
पाहे मिळविण्या जीव चिमुकला

येते वर्षा घेऊन हर्षा
ओल्या स्पर्शा गंध असे
जीव नव्याने जगण्यासाठी
धडपड सृष्टीचीच दिसे

पानापानावरून चालते
थंडाईची नवलाई
घरट्यामध्ये पिल्लं नाचती
छत्र पंखाचे धरे आई

ऊब जराशी हवी वाटते
आपुलकीची जवळीकता
वर्षावाने जलधारांच्या
रटाळ जीवनी आगळीकता

थांबून जाती वाटसरू अन
वाट मोकळी ठरते ही
पाऊस येतो जातो आणिक
स्मृती ओलसर उरते ही

दि.३०/०५/२०२५
सायं. ०७.०४ वा.

(३५)
ही बाग जांभळी जी

ही बाग जांभळी जी
गेली मनात राहून
फुलले नवेच जगणे
तिजला मी फुलता पाहून

वेड्या खुळ्या उन्हांना
आता तो जोर नाही
मिळते अशी दिशा की
तापास वाव नाही

हे मार्ग पाकळ्यांनी
गेले बुडून सारे
रंगात रंगलेले
आता उनाड वारे

आकाश दूर तेथे
सोडून निज निळाई
झाले खुलून आले
लेऊन जांभळाई

रंगास रंग आम्ही
दिधले जे व्यर्थ काही
खाणाखुणा प्रतिमा
अन त्यास अर्थ नाही

दि.०१/०६/२०२५
रात्री १२.५४ वा.

(३६)
ऋणानुबंधांचे बंध अगणित

ऋतू अंगावर बहारलेले
नभ मेघांनी भरून गेले
धरणीवरती आकाशाचे
नाते आगळे उरून गेले

फुलती पाने फुले डोलती
कोंब कुशीतून हळू बोलती
आज इथे हे भविष्य उमलून
आनंदाला क्षण हे तोलती

हिरवी हिरवी तृणे खेळकर
स्पर्श रेशमी रुळे अंगावर
कळ्या लाडूल्या गोड गोजिऱ्या
किती भाळावे मधु रंगावर

कोण कुणाची वाट पाहते
कोण इथे मग रमून राहते
कुणास लगे ओढ अनोखी
कोण कुणावर जीव वाहते

कसे हे जुळते नाते अनामिक
ऋणानुबंधांचे बंध अगणित
मनास सांगा कसे बांधावे
जगा भरभरून जीवन क्षणिक

दि.०६/०६/२०२५
रात्री ११.३८ वा.



(३७)

उत्सव रम्य पहावा

रोज उमलत्या किती कळ्यांचा
हिशोब कुणी ठेवावा
रानोमाळी रोज दिवाळी
उत्सव रम्य पहावा

रंग वेगळे छंद आगळे
फुलणे अपरंपार
आकारांची किती ऐश्वर्ये
एक मनी झंकार

पानापानातून रम्यसा
एक आवाज येतो
कोंब कळीचा सौंदर्याने
ओसंडून हा जातो

मुळे सांगती खोडांना की
फांद्या डवरून याव्या
झाडावरुनी दूर दिशांना
गंधराण्या धाडाव्या

दि.०८/०६/२०२५
रात्री ११.४२ वा.



(३८)
परमेशा, अगणित तू उरशी

हे परमेशा तुझीच सृष्टी
कुठे कशी तर कुठे कशी
जणू रम्यता दिसे मांडली
रूपे मनोहर तुझी अशी

झाडे वेली जरी सारखी
किती भिन्नता वसलेली
कुठे डोंगरे निवांत बसली
कुठे नदी बघ हसलेली

फुले वाटती फुलांसारखी
तरी रंगसौंदर्य कसे
आकाशातील रंगपंचमी
काही वेगळी इथे नसे

सूर्य उगवतो प्रकाश पडतो
किती भाग्य हे आता कळे
जीवनरूपी रस रसलेले
तुझेच असणे नित्य फळे

तूच स्वतःला नानाविध
स्वरूपात जगातुन उतरवशी
कितीही काही दिले भरभरून
तरीही अगणित तू उरशी
परमेशा, अगणित तू उरशी

दि.१०/०६/२०२५
सकाळी ०५.१० वा.

(३९)
सांज आठवे ना साधी

सांज उतरते कशी
जरा वाट ती पाहून
कोणासाठी निशेदारी
रेंगाळती ती राहून

नाही दिस तिचा कधी
नाही रात तिची होत
काही मिळतात तिला
प्रकाशाचे संधी झोत

रात झाकाळून देते
वाट जरा उजळली
सांज सांजेलाच पहा
कशी सांजुन फळली

घरट्यात ज्याला त्याला
पोचण्याची घाई होते
सांज तिथेच हळवी
का हो उतराई होते

कोण ठेवील स्मृतीत
तिच्या आठवणी आधी
दिस रात आठवती
सांज आठवे ना साधी

दि.२०/०६/२०२५
रात्री ०२.२१ वा.

(४०)
सुरम्य जगणे दिसावे

असे वाटते इथे रमावे
निवांत निळ्या नभतळी
सरोवरातील प्रतिबिंबाचे
चित्र मोहवी जळी

पाचू पसरले मन हे विसरले
इथेच मी त्यावेळी
शोधून घेईन स्मृतींस नेईन
भुलून याही वेळी

आकाशातील शुभ्र पांढऱ्या
ढगात स्वप्न हे वाहे
तरंगून मी हलके हलके
त्या नगरीतच राहे

फुले उमलुनी गाती गाणी
सुरेल स्वर सांगाती
पर्वतरांगा निळसर हिरवट
अनवट वाटा जाती

पुन्हा पुन्हा मी इथेच यावे
जरा बसावे हसावे
पुन्हा पुन्हा मज मनास येथे
सुरम्य जगणे दिसावे
सुरम्य जगणे दिसावे

दि.०४/०८/२०२५
सकाळी ०८.१८ वा.

(४१)
आली पहाट सुंदर

आली पहाट सुंदर
तिचे प्राचीवर घर
किरणांची तोरणे नि
केशराची जर वर

तिच्या दारात प्रेरणा
उषा घेऊनिया आशा
नवं सुरुवात एक
एक तारुण्याची भाषा

ती न जुनी होते कधी
कधी नाहीच पुराणी
भाळतो जो तिच्यावर
रविराजाची ती राणी

किलबिलाट कानाशी
एक उमेद मनाशी
उमलून येई सृष्टी
घरीदारी नि वनाशी

जगण्याचा हा आरंभ
दिव्य धुंदसा सुगंध
रोज पहाटेस तिला
पाहण्याचा जडो छंद

दि.१७/०९/२०२५
सकाळी ०९.३२ वा

(४२)
नदी गीत गाताना

खळखळ वाहून जशी हासते
नदी गीत गाताना
पावन करते चराचरांना
ध्येयाप्रत जाताना

अगणित उठती तरंग विरती
तरी दुःख ना करते
जो जे मागेल त्याची ओंजळ
जीवन जलाने भरते

काठांचा आधार वाटतो
तरीही थांबणे नाही
जे गेले ते प्रवाह क्षण मग
परतून येणे नाही

एक सागरा समान कोणी
तिष्ठत वाट पहातो
कधी कळावे तुला माणसा
तू साचून का रहातो

सतत वाहणे हसणे गाणे
जीवन प्रवाह वाहो
अर्पण आणि समर्पण करणे
नित्य मनाशी राहो

दि.२१/०९/२०२५
रात्री ११.५३ वा.

(४३)
विरंगुळा

विरंगुळा कशाला तो
म्हणावा हे दिसते
मन हिरवाईच्या रंगी
रंगुनिया बसते

दूर तिथे डोंगरावर
त्याला पाठवावे
उंचावरूनिया भुईस
खोल आत साठवावे

तरुवर तिथे खग
झाले मन माझे
किलबिल आनंदाचा
स्वर कसा जागे

सरोवरी आता त्याने
जळ होत जावे
लाटांवरी आनंदाचे
तरंग गात जावे

गवताच्या पात्या
लुसलूस काळजाच्या
काळजात पात्या
लवलव भावनेच्या

घरकुल तिथे कुणी
मांडले रानात
सृष्टी सारी बोलते ना
गुज हो कानात

दि.२८/०९/२०२५
रात्री १२.३८ वा.



(४४)
रोज ऊन्हं सांगा बरे

रोज ऊन्हं सांगा बरे
कोणाशी बोलती
प्रभातीच्या वेळी
पानापानात डोलती

कसे कळतात त्यांना
मार्ग रोजचेच
चुकती ना कधी कसे
येती बरोबर तेच

सकाळी कुठे नि
सांगा दुपारी कुठे ते
सांज येता मिटायाचे
कळते कसे ते

कोवळत्या सकाळी या
तापायाचे नाही
भर दुपरीला लाही
लाही होत काही

कधी शांत कधी
अंगारच होत जाणे
कधी सोनसळी कधी
काळेसावळे बहाणे

दि.२९/०९/२०२५
सकाळी ०९.५१ वा.

(४५)
हिमाचली सार्थकत्व

देवभूमी हिमालयी
निसर्गाची उधळण
रंग खेळतात होळी
देखणीशी मिसळण

उन्हं चुंबतात शृंग
नगराजाचे वाकून
हिम वाढवी सौंदर्य
खडकास की झाकून

देवस्त्रियांची दर्पणे
हिमालयी अंगोपांगी
भूवरीची कीर्ती देव
लोकी शिखरांनी सांगी

झाडे सुरुची वाढती
मनी ईर्षा भरूनी
कातरली पाने कशी
गेली आकाश तरुनी

एक आगळी शांतता
सत्त्व तपाचरणांचे
हिमाचली सार्थकत्व
आराधना साधनांचे

दि.१५/१०/२०२५
रात्री ११.०३ वा.

(४६)
तिची दिवाळी ऋतूऋतूंची

इथे चालली प्राजक्ताची
धुंद मोहक दिवाळी
झाडावरूनी टपटप गळती
चांदण पणत्या आळी

पहा अंगणी दीप पेटले
तेज पसरले सारे
शुभ्र दलांच्या पणत्यांमध्ये
केशर ज्योती धुमारे

इवल्या इवल्या लक्ष ज्योतीने
ओवाळती भूमीला
वसुंधरा सौंदर्यवती मग
पहा उजळ अवनीला

दमक दमक दमकून जाते
गंधवती पृथ्वी ही होते
तेज तेजाचे लखलखणारे
रूप स्वतःचे भाळून पहाते

तिची दिवाळी ऋतूऋतूंची
नव्यानव्याने बहरावी
स्वये भूधरा सवे तिज वरा
धुंद धुंदुनी विहरावी

दि.१९/१०/२०२५
रात्री ०९.२५ वा.



(४७)

आजची नवी पहाट

नव्याचं नवेपण
कोरं करकरित असणं
नेहमीच भावतं
नवं नवं दिसणं

नवी सकाळ आली
नव्या वर्षाच्या उंबऱ्यात
हवाही सर्द झाली
शिशिराच्या शिरशिऱ्यात

हालचाल पानांची
झाडावेलीवर नवाळली
रात्रीची गडद किनार
प्राचीवर मवाळली

लाटांची गाणी
लयदार झाली अजून
कोंबांचा जन्म
सुखावतो मधून

नव्या पालवीच्या
वसंताची चाहूल
नव्या ऋतू, काळाची
नवी नवी भूल

आजची नवी पहाट
नव्या तेजात बुडली
मनात सुद्धा एक नवी
कोमल पहाट घडली

दि.०१/०१/२०२४
सकाळी ०६.२१ वा.



(४८)
फुलण्याचं सुख मोठं

कसं जमतं फुलांना
रोज नव्याने उमलणं
झुळूक हलकी असली तरी
हिंदोळ्यावर झुलणं

माहीत नसेल का त्यांना
जगणं थोडं अन लगेच सुकणं
सुंदर कवळ्या देहाला
काही क्षणात मुकणं

मला वाटतं माहीत असेल
नक्कीच सारं काही
फुलण्याचं सुख मोठं
त्यापुढे सुकणं काहीच नाही

डवरून यायचं
कळीचं फूल व्हायचं
ऋतुसंगे सारे ऋतू
भोगत उपभोगत पुढे जायचं

दुःखाचे वारे येतात
कळ्यांच्याही वाट्याला
तरी हसतात स्वागताला बसतात
गिणत नाहीत काट्याला

एकंच ठरवावं जगताना
क्षण आलाय न, कळीचं फूल व्हायचं
आपल्यात रमून जात
संकटांसाठीही भूल व्हायचं

दि. ०२/०१/२०२३
सकाळी ०९.३५ वा.

(४९)

खळी नवेली अजून खुलली

हिरव्या हिरव्या पानांमधली
पीत फुलांची जाळी
का उगाच ही विरही माझ्या
मनास हलके जाळी

या इथेच तू आणिक मीही
भेटत असता कितीदा
उमलून आली फुले सोनेरी
ऋतू लेऊनी कितीदा

हसली बसली रुसली होती
फुलेही माझ्या सवे
रोज नव्याने गोडगोडवे
रंग सोनेरी नवे

लाजलाजुनी अंग चोरुनी
गोरीमोरी मी होता
रानातुन अळुमाळू फुलांची
लाज गंधून जाता

तू गालावर फिरवून देता
हीच फुले रेशमी
खळी नवेली अजून खुलली
खुलले कितीदा मीही

दि.०६/०१/२०२४
रात्री १०.०९ वा.

(५०)
ओल्या खुणांचे उरती ठसे

ओल्या खुणांचे उरती ठसे
अन दुःख उरते सदाची कसे
ती ओल मायेची राहते मनी
जखमांना ओल्या लपवे कुणी

नात्यांचा ओलावा पापणी ओली
ओल्या आठवणी अन पाठवणी ओली
ओल्या दवांची पहाऽऽट ती ओली
ओल्या कळ्यांची उमलवाटही ओली

ओलेत्या भुईचे गर्भा धारणे
बीजातून ओलावी कोंब अंकुरणे
ओल्या नदीच्या खुणा ओल भरल्या
तीरावर पावलांच्या नक्षीने भरणे

तृषार्त चोचीतले चातकपण ओले
आईच्या डोळ्यातील वात्सल्य ओले
नको कोरडे काही ते रूक्ष होते
मन ओले चिंब प्रीत बोल किती ओले

ओल्याशा देहातील चैतन्य ओले
ओल्या अंतःकरणी आत्मभान ओले
जगण्यातील जगणे हे सदा ओले ओले
मरताना कंठातील थेंब चार ओले

दि.०८/०१/२०२४
रात्री १०.५९ वा.

(५१)

भारलेली रातराणी

रातराणीच्या सुगंधामध्ये
फक्त दंग होऊन जावं
शब्दही न बोलता देखील
गंधवेडं गाणं गावं

अंधारलेल्या वातावरणात
भारलेली रातराणी
इतका मादक परिमळ तिचा
सुरभित उमलून येते कहाणी

अलगद पहाते ती हजार डोळ्यांनी
कोश उघडून भंडार उधळीत
मी रोज रात्री तिला शोधते
उमलत्या फुलात मिटलेल्या कळीत

कुणाची वाट पाहते म्हणून
सुगंधात न्हाऊन निघते
प्रियवरच्या वाटेवरती
आमोद सुवास भरून निघते

थबकलाच नाही तो
कसला रसिक मानावा
सौरभाच्या साम्राज्याचा
रातराणी मुकुट जाणावा

दि.१२/०१/२०२४
सकाळी ०६.४७ वा.



(५२)
जीवनाची रीत ही

आज बहराच्या ऋतुने
गंध ल्याले
आणि चैतन्याचे अमृत
घोट प्याले

पालवी फुटली जीवाला
कोंब आले
उमलुनी आशा निघाल्या
स्वप्नं झाले

हिंदोळे घेऊन वारा
छंद वेडा
झोंबतो तो लोम्बतो
बघ गंध वेडा

फांदी फांदी पल्लवीने
झाकलेली
सावलीही दाट पायी
टाकलेली

पुष्प फळ लगडून आल्या
ज्या ऋतुल्या
ओसरून जातील कधी
हिरव्या पानुल्या

ओळखावी हार कधी अन
जीत ही
जीवनाची जाण आहे
रीत ही

दि.१८/०१/२०२४
सकाळी ०९.४३ वा.

(५३)
धुक्या धुक्यावर धुकटशी रेघ

त्या धुक्यातून भास सारे
अंगावरती येती शहारे
आजही मला आठवती ना
दवबिंदूंचे चमचम तारे

थंडी गुलाबी हुडहुडणारी
प्रीत बावरी कुडकुडणारी
मिठीतल्या त्या वेळा हव्याशा
मीलनी गोड गुलाबी खाशा

हातामधले हात घट्ट जे
परस्परांचे होते धरले
भटकंतीचे गोड आठवे
खोल मनाशी सदाची उरले

वाफाळलेल्या नि:श्वासातील
विश्वासाचे प्रीत तरंग
धुक्या पुसटश्या सभोवतालीचे
अनोळखी तरी गडदसे रंग

तशात पसरून जाते अलगद
एक लाजेचे धुके सुरेख
कसा हटवशील पडदा राजा
धुक्या धुक्यावर धुकटशी रेघ

दि.२०/०१/२०२४
सकाळी ०७.३४ वा.

(५४)
नभ गाभूळ होताना

अंगावरती झेलून पाऊस
ओल गंधात आली
नवी तरतरी फुला पाकळीत
अंगा अंगात आली

रंग चमकले धुतले जाऊन
तरारल्या ह्या वेली
झाडे झाडे उत्साहाच्या
नव्याच रचती ओळी

मातीमधले सुगंध पसरून
आसमंतात उडती
एकच पाऊस तरी किती ही
सुंदर दृश्ये घडती

काय सांगते आभाळातील
मेघमालेची ओढ
ग्रीष्मामधल्या काहिलीवरती
औषध जणू हे गोड

मनात कधीतरी येते भरून हे
नभ गाभूळ होताना
आत झरून मग येतो पाऊस
भावधारा ल्येताना

दि.०४/०२/२०२३
रात्री ११.५३ वा.



(५५)
ऋतू भावनांचे येती

हळुवार पालवीचे
ऋतू भावनांचे येती
कळ्या कोंब प्रीतभरल्या
मज ओंजळीत देती

विरहातला शिशिर हा
झडतात मीलनेही
भेटावयाची आस
आतूर की मनेही

फुलतात रंगभरली
सुमने मनात सारी
मधुमास गंधभरला
येतो तशात दारी

सृष्टी नवीच होते
कोकीळ कंठ गाई
मोहोर आम्रतरुवर
मादकता ठायी ठायी

प्रणयास जाग येते
ह्रदयी वसंत फुलता
जणु स्वर्ग लाभतो मज
प्रिये बाहुतून झुलता

ठेवू जपून सारे
मनकोंदणी पिसारे
ऋतू हा वसंत वेडा
वेडातले धुमारे

दि.२२/०३/२०२४
संध्याकाळी ०७.१७ वा.

उदय सामंत

मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण
महाराष्ट्र राज्य

20/09/2021

प्रति,
डॉ. मंजूषा कुलकर्णी,
सहा. प्राध्यापक,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.

आपल्या प्रकाशमार्गा: या डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या जीवनचरित्राच्या संस्कृत अनुदीत पुस्तकास सन 2020 चा प्रतिष्ठेचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाल्याचे समजून आनंद झाला. त्याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन.

मराठीतील प्रकाशवाटा या त्यांच्या चरित्राला आपल्या संस्कृत अनुवादाने साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त होणे ही मराठी आणि संस्कृत या दोन्ही भाषांसाठी गौरवाची बाब आहे.

आपली साहित्य सेवा सातत्याने सुरू असून, आपल्या भविष्यातील शैक्षणिक व साहित्यिक वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा!

(उदय सामंत)

कार्यालय : दालन क्र. ५०१, पाचवा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. ✆०२२-२२०२२१०० / २२०२३९९२
निवास : ब-२, बंगला, मॅडम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२. ✆.०२२-२२०२४५७० / २२०२५३११
ई-मेल : ministerudaysamant@gmail.com / udaysamant.minister@nic.in @samant_uday
@udayravindrasamant @uday.samant

२५२, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग,
शिवाजी उद्यान, दादर, मुम्बई-४०० ०२८
दूरध्वनी : २४४६ ५८७७
फॅक्स : २४४५ ९१९७

SWATANTRYAVEER
SAVARKAR
RASHTRIYA SMARAK
252, Swatantryaveer Savarkar Marg,
Shivaji Park, Dadar, Mumbai-400 028.
Tel.: 022-2446 5877
Fax : 022-2445 9197
E-mail : office@savarkarsmarak.com
Website : www.savarkarsmarak.com

SSRS 230214

दिनांक ०८ मार्च २०२३

विद्यमान पदाधिकारी

अध्यक्ष -
प्रवीण दीक्षित
(आय.पी.एस.)

कार्याध्यक्ष -
रणजित सावरकर

कोषाध्यक्ष -
मंजिरी मराठे

कार्यवाह -
राजेंद्र वराडकर

सहकार्यवाह -
स्वप्नील सावरकर

प्रति,
डॉ. मंजुषा कुलकर्णी
साकेत २५,जयवंत पालकर मार्ग,
वरळी,मुंबई-४०००३०
भ्र.ध्व. ९०८२१६१५२४

विषय : आचार्य बाळाराव सावरकर लिखित स्वा. सावरकर चरित्राच्या हिंदीच्या चार खंडांपैकी पहिल्या दोन खंडांची गुणवत्ता तपासणी आणि इतर दोन खंडांचे भाषांतर तसेच चारही खंडांचे संस्कृत भाषांतर करण्याबाबत....

महोदया,

अंदमानमधील काळ्यापाण्याच्या शिक्षेतून सुटका झाल्यावर इंग्रजानी स्वातंत्र्यवीर सावरकरांना राजकारणात भाग न घेण्याच्या अटीवर रत्नागिरी येथे स्थानबद्धतेत ठेवले होते. ह्या कालखंडात स्वातंत्र्यवीरांनी उघडपणे हिंदुसमाजसुधारणेचे नि हिंदुसंघटनेचे कार्य केले. ह्या कालखंडातील स्वातंत्र्यवीरांचे कार्य सावरकरांचे स्वीय सहायक आचार्य बाळाराव सावरकर यांनी रत्नागिरी पर्व, हिंदसभा पर्व, अखंड लढा पर्व आणि सांगता पर्व अशा चार खंडात विस्तृत आणि साधार लिहिले आहे. मराठी भाषेतील या चारही खंडांचे पुनर्प्रकाशन डॉ. सुब्रम्हण्यम स्वामींच्या हस्ते २०२० मध्ये झाले.

सावरकरांच्या कार्याची व्याप्ती देशात आणि परदेशात देखील होती. मराठीमधील या चार खंडाचे प्रकाशन इतर भाषांमध्ये यावे यासाठी मागणी होत आहे. या अनुषंगाने स्मारकाच्या कार्यकारिणी समितीच्या दि. २६ डिसेंबर २०१९ च्या बैठकीमध्ये याबाबत चर्चा होऊन हिंदी आणि संस्कृतमध्ये याचे भाषांतर व्हावे असे ठरले आणि भाषांतराकरीता आपले नाव सुचविण्यात आले. परंतु कोरोनामुळे आणि आर्थिक संकटामुळे भाषांतराचा प्रकल्प स्मारकाने स्थगित केला होता. आता खडांच्या संस्कृत आणि हिंदी भाषांतराचा प्रकल्प पुन्हा हाती घेण्याचे ठरले आहे.

Registered under the Bombay Public Trusts Act. 1950 Regn. No. F-1468 (Bom)

आपला संस्कृत भाषेचा दांडगा अभ्यास आहे आणि भाषेवर प्रभुत्व आहे. तसेच डॉ. प्रकाश आमटे यांच्या प्रकाशवाटा या आत्मचरित्राच्या संस्कृतमध्ये केलेल्या 'प्रकाशमार्गा:' या अनुवादाला आपणास २०२१ साली साहित्य अकादमीचा संस्कृत साहित्यासाठीचा पुरस्कार मिळाला आहे.

या पत्राद्वारे अशी विनंती करीत आहोत कि हिंदीच्या चार खंडांपैकी पहिल्या दोन खंडांची गुणवत्ता तपासणी आणि इतर दोन खंडांचे भाषांतर करायचे आहे. संपूर्ण चारही खंडांचे संस्कृत भाषांतर करावयाचे आहे. या प्रकल्पाचे संपादक म्हणून एक लक्ष रुपयाचे मानधन आपणांस देण्यात येईल.

UR PARCEL

साहित्य अकादेमी

रवीन्द्र भवन, 35 फीरोज़शाह मार्ग, नई दिल्ली-110 001
दूरभाष : +91-11-2338 6626-28
फैक्स : +91-11-2338 2428
ई-मेल : secretary@sahitya-akademi.gov.in
वेबसाईट : http://www.sahitya-akademi.gov.in

Sahitya Akademi
(National Academy of Letters)
Rabindra Bhavan, 35 Ferozeshah Road, New Delhi-110 001
Phone : +91-11-2338 6626-28
Fax : +91-11-2338 2428
E-mail : secretary@sahitya-akademi.gov.in
website : http://www.sahitya-akademi.gov.in

डॉ॰ एन॰ सुरेश बाबु
उपसचिव (प्रकाशन)
दूरभाष: 011-23073899

सा.अ./841/15/

3 जनवरी 2024

वैदिक संस्कृते: विकास:
(पु. मराठी संस्कृति इतिहास)
ले. तर्कतीर्थ: लक्ष्मणशास्त्री जोशी, संस्कृत अनु. मंजूषा कुलकर्णी

प्रिय डॉ. मंजूषा कुलकर्णी,

साहित्य अकादेमी की ओर से शुभकामनाएं !

आपको यह जानकर प्रसन्नता होगी कि आप द्वारा अनूदित उपरोक्त पुस्तक प्रकाशित हो गई है। साहित्य अकादेमी की ओर से पुस्तक की दस प्रतियाँ इस पत्र के साथ भेंट स्वरूप संलग्न की जा रही है। कृपया स्वीकार करें और प्राप्ति सूचना ईमेल: ds.pub1@sahitya-akademi.gov.in पर भेजने की कृपा करें।

नव वर्ष 2024 की शुभकामनाओं सहित,

आपका,

3/1/2024
(एन. सुरेश बाबु)

संलग्न यथोक्त :
डॉ .मंजूषा कुलकर्णी
25, Jaiwant Palkar Marg
Opp. Poddar Ayurvedic Rognalaya
Worli,
Mumbai 400 030
Mob: 09082161524

डॉ. के. श्रीनिवासराव
सचिव
Dr. K. Sreenivasarao
Secretary

गोपनीय / स्पीड पोस्ट

साहित्य अकादेमी
(राष्ट्रीय साहित्य संस्थान)
संस्कृति मंत्रालय, भारत सरकार की स्वायत्तशासी संस्था
Sahitya Akademi
(National Academy of Letters)
An Autonomous Organisation of Government of India, Ministry of Culture

सा.अ./2/

3 अप्रैल 2023

विषय : संस्कृत भाषा परामर्श मंडल

प्रिय बंधु,

साहित्य अकादेमी की ओर से शुभकामनाएँ।

कृपया साहित्य अकादेमी के पत्र दिनांक 29 मार्च 2023 का संदर्भ लें जो कि संस्कृत भाषा परामर्श मंडल में आपकी सदस्यता से संबंधित है। उपरोक्त पत्र में कुछ टंकण त्रुटियाँ रह गई थी, अतः आपसे अनुरोध है कि उस पत्र पर ध्यान नहीं दें।आपके संदर्भ के लिए संशोधित पत्र का विवरण नीचे दिया गया है। इस असुविधा के लिए खेद है।

मुझे यह सूचित करते हुए खुशी हो रही है कि आपको साहित्य अकादेमी के संस्कृत भाषा परामर्श मण्डल में सदस्य के रूप में नामित किया गया है। परामर्श मण्डल का कार्यकाल दिसंबर 2027 तक होगा।

मुझे आशा है कि आप इस परामर्श मण्डल की सदस्यता ग्रहण करेंगे तथा संस्कृत भाषा की उन्नत्ति के लिए साहित्य अकादेमी द्वारा आयोजित विभिन्न गतिविधियों, प्रकाशनों एवं कार्यक्रमों के लिए अपना पूर्ण सहयोग / योगदान देंगे।

आपके संक्षिप्त जीवन परिचय के साथ, शीघ्र सकारात्मक उत्तर की प्रतीक्षा में,

सादर,

आपका विश्वासपात्र

(के. श्रीनिवासराव)

डॉ. मंजुषा कुलकर्णी

रवींद्र भवन, 35 फ़ीरोज़शाह मार्ग, नई दिल्ली-110 001, दूरभाष : +91-11-2338 7064, 2307 3002, फैक्स : +91-11-2338 2428
Rabindra Bhavan, 35 Ferozeshah Road, New Delhi-110 001, Phone: +91-11-2338 7064, 2307 3002, Fax +91-11-2338 2428
E-mail: secretary@sahitya-akademi.gov.in, Website: http//www.sahitya-akademi.gov.in

दू.क्र.२६५५२१८४
फॅक्स २६४१७२६५

क्रमांक :-संकीर्ण-२०१७/५९३ /एक,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.
दिनांक :- 22/3/2017

प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
मराठी भाषा विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय :- महाराष्ट्र सदन (नवे) येथील राज्याच्या मुद्रेतील चुका दुरुस्त करणेबाबत.

संदर्भ :- १. डॉ. मंजूषा कुलकर्णी, भाषा संचालक यांचे दि.२३.५.२०१६ रोजीचे पत्र.
२. व्यवस्थापक, निवासी आयुक्त व सचिव यांचे कार्यालय, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. निआ/व्यमस/नमस/साप्रविपव्य/२६-IV/२०१४/२८८७.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्र क्रमांक १ च्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार महाराष्ट्र सदन, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली येथील राज्य अतिथीगृहात असलेल्या महाराष्ट्र राज्याच्या राजमुद्रा प्रतिकातील त्रुटी निवासी अभियंता (प्र) सार्वजनिक बांधकाम यांनी दुरुस्त केल्या आहेत असे संदर्भित पत्र क्रमांक २ अन्वये कळविले आहे. तसेच याबाबतचा अनुपालन अहवाल माहितीकरिता सादर केला आहे.

भाषा संचालकांनी महाराष्ट्र राज्याची अभिमानबिंदू असलेली मुद्रा अचूक करून घेण्यासाठी केलेले प्रयत्न फळाला आलेले असून महाराष्ट्र राज्याची मुद्रित भाषिक अस्मिता जपून वृद्धिंगत केलेली आहे. याची दखल मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी घेऊन अभिनंदन केले आहे.

आपल्या माहितीस्तव सहर्ष सादर.

आपली,

(डॉ. मंजूषा कुलकर्णी)
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

सहपत्र :- व्यवस्थापक, निवासी आयुक्त व सचिव यांचे कार्यालय, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचे पत्र.

प्रत :- १. विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन, मा.मंत्री मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. खाजगी सचिव, मा.मंत्री मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

e data-Desk-1-का.मसुदा-2015

253

महाराष्ट्र शासन

E-mail id : sd4.sesd-mh@gov.in

क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.९/एसडी-४.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ जानेवारी,२०२३.

प्रति,
डॉ. मंजुषा कुलकर्णी,
उप सचिव,
उप मुख्यमंत्री कार्यालय,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय : मा.पंतप्रधान महोदयांच्या Exam warriors या पुस्तकाच्या मराठी भाषांतर प्रतीचे अनावरण कार्यक्रमाबाबत.

महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस विनंती करण्यात येते की, Exam warriors या मराठी पुस्तकाचे अनावरण करण्याचा कार्यक्रम दि. १९.०१.२०२३ रोजी मा. राज्यपाल महोदय यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करण्यासाठी आपणास आमंत्रित करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमात उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, ही विनंती.

आपली,

(मृणाली काटेंगे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन.

श्री. काजी यांनी दि. १७/१/२३ रोजी
मा. सचिव डॉ. श्रीकर परदेशी महोदयांची
भेट घेऊन परवानगी घेतली आहे.

दुर२४४७६९३८-०२०.क्र.

Email -
neptaskstatecell@gmail.com

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदमहाराष्ट्र.
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. राशैसंप्रपम / SCF SE निवड-परासनि/ २०२३ -२४ / ०५६५४२- दिनांक:-०३/१०/२०२३
०५

प्रति,

डॉ/श्रीम/श्री. मंजूषा कुलकर्णी

(सोबतच्या यादीनुसार)

विषय : राज्य अभ्यासक्रम आराखडा -शालेय शिक्षण (SCF -SE) समिती सदस्य निवड प्रक्रियेसाठी पथक सदस्य म्हणून कामकाजाबाबत

संदर्भ : १.शासनाचे मान्यता पत्र जा. क्र. संकीर्ण-२०२३/प्र. क्र. ४६/एसडी दिनांक२०जुलै२०२३

२. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण (NCF - SE)

सन्माननीय सदस्य...

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या २९ जुलै २०२०रोजीच्या बैठकीमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी देण्यात आली आहे. भारत सरकार, नवी दिल्ली यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील लक्ष्यसाध्य करण्यासाठी कृती कार्यक्रमाचा कालबद्ध कार्यक्रम सार्थक (SARTHAQ) पुस्तिकाद्वारे प्रसिद्ध केला आहे. सदर धोरणातील शिफारशीनुसार राष्ट्रीय राज्य आणि जिल्हास्तरावरून प्राधान्याने करावयाच्या कार्याची (Task) कार्यवाही केंद्राप्रमाणे राज्यातही टप्प्या-टप्प्याने सुरू आहे.

शिक्षणातील अभ्यासक्रमाच्या नवीन आकृतीबंधानुसार कालानुरूप २१व्या शतकातील शैक्षणिक उद्दिष्टांनुसार अभ्यासक्रमात बदल करणे आवश्यक असल्याने राष्ट्रीय पातळीवरून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -पायाभूत स्तर (NCF - FS) माहे ऑक्टोंबर २०२२ आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण (NCF - SE) माहे ऑगस्ट २०२३मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे. प्रत्येक राज्य आपापल्या स्थानिक गरजा व संस्कृतीचा विचार करून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यातील मूळ मार्गदर्शक तत्त्वांशी अनुरूप राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF) तयार करत असते. राज्य अभ्यासक्रम आराखडा -शालेय शिक्षण (SCF - SE) विकसित करण्याचे कार्य नोडल एजन्सी म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या कार्यालयाने सुरू केले आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखडा -शालेय शिक्षण विकसनासाठी शालेय ते विद्यापीठस्तरीय इच्छुक तज्ज्ञांकडून लिंक द्वारे प्रतिसाद नोंदवून घेण्यात आलेला आहे. या तज्ज्ञांमधून राज्य अभ्यासक्रम आराखडा -शालेय शिक्षण (SCF - SE) समिती सदस्यांची निवड करावयाची आहे.

निवड प्रक्रियेसाठी पथक समिती सदस्य म्हणून आपली शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, अनुभव, तज्ज्ञता याचा विचार करून नियुक्ती केलेली आहे.

सदर निवड प्रक्रिया दिनांक १२ व १३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. तथापि पडताळणी अधिकारी व पथक समिती सदस्य यांचे उद्बोधन सत्र दिनांक ११ ऑक्टोबर २०२३ रोजी परिषदेत आयोजित करण्यात आले आहे. पथक समिती सदस्य म्हणून या उद्बोधन सत्रास आपण उपस्थित रहावे.

पथक समिती सदस्यांची निवास व्यवस्था परिषदेच्या अतिथी भवनात करण्यात आली आहे. शासन नियमानुसार प्रवास भत्ता व मानधन सदस्यांच्या बँक खात्यावर अदा करण्यात येईल. याकरिता रद्द धनादेश सोबत आणावा.

तरी आपली उपस्थिती दिनांक ११ रोजी दुपारी २.३० वाजताच्या बैठकीपासून ते १३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत पूर्णवेळ आवश्यक आहे.

सोबत :- १) पथक समिती सदस्यांची यादी

२) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -शालेय शिक्षण (NCF - SE) सॉफ्ट कॉपी.

(अमोल येडगे भा.प्र.से.)
संचालक,

देवेंद्र फडणवीस

मुख्य मंत्री

महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय

मुंबई-४०० ०३२

२० जुलै २०१७

शुभेच्छा

लोकबिरादरी प्रकल्पाच्या माध्यमातून हेमलकसा परिसरातील वनवासी बांधवांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे कार्य करणाऱ्या डॉ. प्रकाश आमटे यांच्या दुर्दम्य जिद्दीचा प्रवास चितारणाऱ्या प्रकाशवाटा या पुस्तकाचे संस्कृतमध्ये भाषांतर होत आहे, ही आनंदाची बाब आहे.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे यांच्या महान स्वयंसेवी कर्तृत्वाचा वारसा समर्थपणे सांभाळणाऱ्या डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदाताई या दाम्पत्याने वंचित आणि उपेक्षित जनसमुहाच्या जीवनात प्रकाश फुलविण्यासाठी केलेली धडपड प्रेरणादायी आहे. प्रकाशवाटा या आत्मचरित्राच्या माध्यमातून ती मराठी वाचकांपर्यंत यापूर्वीच पोहोचली आहे. भारतीय संस्कृतीचे अलौकिक संचित सामावणाऱ्या संस्कृतमध्ये होणारा या पुस्तकाचा अनुवाद नवी क्षितिजे स्पर्शणारा आहे. त्यादृष्टीने अनुवादक डॉ. मंजुषा कुलकर्णी यांचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

प्रकाशमार्गाः या संस्कृत अनुवादास मनःपूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

13/14

दूरदेशीही नांदे माझी मराठी आनंदे - स्पर्धा स्वरूप व अंतिम निकाल (महाराष्ट्र मंडळ सिंगापूर)

Inbox

President - Maharashtra Mandal (Singapore) <president@mmsingapore.org> Thu, Oct 22, 2015 at 8:40 PM

To: manjusha kulkarni <drmanjushak@gmail.com>

Cc: "vicepresident@mmsingapore.org" <vicepresident@mmsingapore.org>, "secretary@mmsingapore.org" <secretary@mmsingapore.org>

Reply | Reply to all | Forward | Print | Delete | Show original

नमस्कार मंजुषा मॅडम,

आपणांस कळविण्यास आनंद वाटतो की आपण सुचविल्याप्रमाणे आम्ही मराठी भाषेच्या विविध स्पर्धा इथे सिंगापुरात राहणाऱ्या मुलांसाठी तीन वयोगटांत घेऊ शकलो.

या स्पर्धांना अतिशय उत्तम प्रतिसाद लाभला. अनेक पालकांनी, "या अशा स्पर्धा दरवर्षी घेतल्या पाहिजेत" अशा प्रतिक्रियाही दिल्या.

मला येथे आमच्या महाराष्ट्र मंडळ परिवारातील काही स्नेहीजनांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो, की ज्यांनी या स्पर्धांचा उत्कृष्ट आराखडा तयार केला व त्याचप्रमाणे या स्पर्धा घेण्यास मदत केली. माधव भावे, नितीन मोरे, वृंदा टिळक, जुई चितळे, अरुण मनोहर, विशाल पंढारकर, अस्मिता तडवळकर या चमूच्या उत्तम नियोजनामुळेच या स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडू शकल्या.

स्पर्धा तीन वयोगटांत घेतल्या गेल्या. स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे:

मोहोर गट (२००० - २००३ मध्ये जन्म)

१. निबंध गृहपाठ

प्रथम क्रमांक उत्कर्ष ठाकूर
प्रथम क्रमांक यश करमरकर
तृतीय क्रमांक रजत काळे

२. उत्स्फूर्त भाषण

प्रथम क्रमांक उत्कर्ष ठाकूर
द्वितीय क्रमांक रजत काळे
तृतीय क्रमांक मिहीर घोंगे

प्रिय मॅडम,

गुरुपौर्णिमेच्या मंगलमय दिवसाचे औचित्य साधून आपल्याविषयीचे काही भाव व्यक्त करू इच्छिते. या क्षणी माझी अवस्था रघुवंश रचताना "तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम्" अशी कालिदाससदृश झाली आहे.

असितगिरिसमं स्यात्कज्जलं सिन्धुपात्रे
सुरतरुवरशाखा लेखनी पत्रमुर्वी....

एवढा खटाटोप करून सुद्धा गुरुमहिमा वर्णने शक्य नाही. तरीही आपल्याविषयीची कृतज्ञता भाव व्यक्त करण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

माझ्या आयुष्यात आपण कर्मधर्मसंयोगाने आलात आणि आपल्याशी पूर्वजन्माचे नाते असल्याची भावना दृढ झाली.

"सद्वर्तनं च विद्वत्ता तथाऽध्यापनकौशलम् ।
शिष्यप्रियत्वमेतद्धि गुरोर्गुणचतुष्टयम् ॥"

वरील श्लोकातून आपल्या व्यक्तिमत्वाचे यथार्थ दर्शन घडते.

'श्यामस्य माता' हा आपल्या जीवनातील सुवर्णमेळ असून आमची आई आपल्या केवळ साहित्यकृतीपुरतीच मर्यादित न राहता आपण सदैव आपल्या विद्यार्थ्यांवर मायेची पाखरण केलीत. आपल्या विषयी आम्हाला निरतिशय आदर व आपल्या कर्तृत्वाने सदैव अभिमान वाटतो. आपण आपल्या कर्तृत्वाने सदैव आम्हास प्रेरित करता. आपल्या विषयीची ही माया सदैव आमच्या हृदयी राहो....

आपलीच
विपुला

डॉ. मंजुषा कुलकर्णी संस्कृत भाषेच्या व्यासंगी प्राध्यापिका आहेत. लेखिका कवयित्री आहेत. अनुवादक आहेत.

सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांचं योगदान लक्षणीय आहे.

नामांकित व्यक्तींमध्ये त्यांची गणना होते.

म. मं. रिठे

श्री

वि.वि.चिपळूणकर
☎ (०२४०) २४८२१३८

औरंगाबाद
दि. २४ जानेवारी
२०१५

प्रमाणपत्र

प्रा. डॉ. मंजूषा कुलकर्णी या संस्कृतच्या क्षेत्रातील एक व्यासंगी प्राध्यापिका म्हणून मला परिचित आहेत. त्यांच्या जवळजवळ दहाबारा वर्षांचा हा परिचय आहे.

केवळ अध्यापन कौशल्यच नव्हे, तर भाषण, संभाषण, लेखन इत्यादी भाषाध्ययनाच्या विविध अंगांतील आपली निपुणता त्यांनी विविध स्तरांवरील संस्कृत विषयाच्या संबंधातील बहुविध कार्यक्रमांतील उत्स्फूर्त सहभागातून व कुशल नेतृत्वगुणांनी सिद्ध केली आहे.

'यावज्जीवमधीतेऽध्यापकः' या वचनाच्या डॉ. मंजूषा कुलकर्णी मूर्तिमंत आदर्श आहेत. संस्कृत विषयक अध्यापन व संशोधन यांना पोषक असे काही ना काही शिकत राहणे आणि आपले स्वीकृत अध्यापन व संशोधन कार्य अधिकाधिक विकसित करण्याचा त्यांचा कटाक्ष असतो. त्यामुळेच त्या छात्रप्रिय प्राध्यापिका व व्यासंगी विषयतज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी आतापर्यंत लिहिलेले शोधनिबंध, विविध चर्चांचे केलेले नेतृत्व व त्यांची संस्कृतप्रचाराची तळमळ त्यांच्या गुणोत्कर्षाची साक्ष देतात. विवाहसंस्कार, श्रामणता, स्मृतिवचनानि इत्यादी त्यांची ग्रंथसंपदा त्यांच्या व्यासंगाची ओळख करून देतात.

डॉ. मंजूषा केवळ आपल्या संस्कृतविषयक अध्ययन व अध्यापन आणि संशोधन व प्रसारण या कार्यातच अग्रेसर नसून समाजाच्या सांस्कृतिक उन्नयनाच्या कार्यातही त्यांचा सहभाग असतो. 'शहाणे करोनि सोडावे सकळजन' या उक्तीची प्रचीती त्यांच्या या व अशा समाजहितैषी कार्यात दिसून येते. अवघ्या एक तपाच्या आतापर्यंतच्या आपल्या कारकिर्दीत त्यांनी घेतलेली झेप त्यांची उपजत प्रतिभा, अखंड व्यासंग, सामाजिक संवेदनशीलता, मराठी व संस्कृत भाषा यांच्याविषयीचे प्रेम व प्रभुत्व

'आशीर्वाद', भवानी पेट्रोल पंपामागे, एन-२ सेक्टर, सिडको, जालना रोड, औरंगाबाद-४३१००६

आणि 'स्या ते देतचि जावे' ही ज्ञानविषयक तळमळ असा त्यांच्या विविध गुणांचे प्रकर्षाने दर्शन घडवते-आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ शिक्षणापासून वंचित अशा उमलत्या वयातील मुलामुलींना व्हावा यासाठी त्यांना वाटणारी तळमळ, 'रिकामा जाऊ नेदी येक क्षण' या वचनाची सार्थकता पटवणारी कार्यमग्नता आणि आपल्या अंगीकृत कार्याची दिशा स्पष्टपणे लक्षात ठेवून त्यासाठी स्वतःला वाहून घेण्याची वृत्ती त्यांचे नेतृत्व गुण उत्कटपणे दाखवतात. असे स्वयंप्रकाशी व संवेदनशील, तसेच कार्यक्षम व प्रगमनशील व्यक्तिमत्त्व लाभलेल्या डॉ. मंजूषा कुलकर्णी ज्या ज्या पदावर कार्य करतील त्या त्या पदाची क्षमता व त्याचे सामर्थ्य वाढवतील असा मला विश्वास वाटतो.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या यापुढील वाटचालीस माझ्या मनःपूर्वक शुभकामना.

-वि.वी. चिपळूणकर

निवृत्त शिक्षणसंचालक, महाराष्ट्र राज्य
आणि निवृत्त सल्लागार, राष्ट्रीय
शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था,
नवी दिल्ली.

शुभेच्छा!

प्रा. डॉ. सौ. मंजूषा कुलकर्णी यांना मी त्यांच्या विद्यार्थिदशेपासूनच जाणतो. शालांत आणि उच्च माध्यमिक परीक्षांत त्यांनी विशेष प्राविण्यासह निरनिराळी पारितोषिके मिळविली. त्याबरोबरच पुणे विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांतही संस्कृत विषय घेऊन विशेष प्राविण्यासह त्यांनी यश प्राप्त केले. अध्यापन क्षेत्रातील पदवी आणि पदव्युत्तर परीक्षादेखील त्या याचप्रमाणे प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाल्या. एवढेच नाही तर महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय अध्यापकांसाठी नियोजित पात्रता परीक्षा (सेट आणि नेट) या परीक्षांतदेखील त्यांनी याचप्रकारे यश संपादन केले. अध्ययन आणि अध्यापनाच्या वेगवेगळ्या परीक्षांच्या पूर्ततेनंतरदेखील त्यांची अध्ययनशीलता आणि संशोधनवृत्ती स्वस्थ राहिली नाही. त्यांनी 'स्मृतिसाहित्यातील निवडक स्मृतींचे तौलनिक अध्ययन' या विषयावर अमरावती विद्यापीठाची पीएच.डी. ही संशोधन पदवीही मिळविली. नंतर लगेचच वैदिक संशोधन मंडळ, पुणे या संस्थेच्या संशोधनाशी संबंधित अभ्यासक्रमही पुरा केला.

या दैदीप्यमान अध्ययन-अध्यापन क्षेत्रांतील अभ्यासक्रमाच्या पूर्ततेनंतर निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांत अध्यापनाचे कार्य करताना डॉ. मंजूषा कुलकर्णी या सतत संशोधन, लेखन करीत राहिल्या. त्यामुळेच इ.स. २००२ पासून तर आतापर्यंत त्यांचे अनेक ग्रंथ केवळ प्रकाशित झाले नाही तर विद्वन्मान्य ठरले आहेत. त्यांचे ग्रंथ व लेखन संस्कृत भारती, विश्व संस्कृत प्रतिष्ठान, कर्नाटक विद्यापीठ धारवाड, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक त्याचप्रमाणे मध्य प्रदेशातील इंदौर येथील राष्ट्रीय संशोधन पत्रिका या मान्यवर संस्थांनी प्रकाशित केले आहे.

गेल्या दहा-बारा वर्षांपासून त्या अध्ययन-अध्यापन त्याचप्रमाणे संशोधन व लेखन यांत व्यग्र आहेत. त्यांचे अध्ययन-अध्यापनातील कौशल्य व गुणवत्ता व संशोधन लेखनातील मौलिकता लक्षात घेऊन अनेक संस्थांनी त्यांचा गौरव करण्यात आणि पुरस्कार प्रदान करण्यात धन्यता मानली आहे.

डॉ. मंजूषा कुलकर्णी या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा, गुणवत्तेचा आणि व्यासंगाचा समाजालाही लाभ व्हावा या दृष्टीने सतत प्रयत्न करीत राहिल्या आहेत. श्रीमद्भगवद्गीतेचा प्रसार-प्रचार, संस्कृत अध्यापनाचे वर्ग, संस्कृत भारतीच्या वतीने होणारे संस्कृत संभाषण वर्ग या उपक्रमांत त्या प्रारंभापासूनच सातत्याने कार्यमग्न राहिल्या आहेत. कुशल अध्यापक, विद्यापीठीय प्राध्यापक आणि उपक्रमशील कार्यकर्त्या या भूमिकेत समाज त्यांना गेल्या एक तपापासून पाहत आल्यामुळे एक पथदर्शक आचार्य म्हणून त्यांची प्रतिमा समाजमान्य होत आहे.

त्या नम्र, ऋजू स्वभावाच्या, मृदूभाषी आणि सहजसुंदर अशा संस्कृत भाषेत आपल्या संभाषणकौशल्याने शिक्षण क्षेत्रात त्याचप्रमाणे संशोधन क्षेत्रात सर्वप्रिय झाल्या आहेत. त्यांची अध्ययनमग्नता, परिश्रमशीलता, त्यांना ज्या क्षेत्रात त्या कार्य करतील त्या क्षेत्रांत यशस्वीच राहतील, असा विश्वास निर्माण करणारी आहे. त्यामुळेच माझ्या दृष्टीने त्यांचे भविष्य तर उज्ज्वल आहेच त्याबरोबरच त्यांच्या क्षमतेचा, गुणवत्तेचा, कार्यकुशलतेचा समाजालाही लाभ होईल, असा विश्वास वाटतो.

मी त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात सुयश चिंतितो आणि शुभेच्छा देतो.

- प्रभाकर मांडे २०-०५-१४

प्रभाकर मांडे
'मंगलप्रभा', सावरकरनगर दक्षिण,
सिडको, एन-५, औरंगाबाद
संपर्क : ०२४० - २४८८४७१
चलभाष - ९८८१२ ३३३२८

।। ॐ ।।
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
प्रधान कार्यालय : डॉ. हेडगेवार भवन, महाल नागपुर. 440 032
दूरभाष : 0712 – 2723003. Email- sachivalay@sanghngp.org.in

सरसंघचालक : मोहन भागवत | सरकार्यवाह : दत्तात्रेय होसबाले

श्रावण कृ. 02 युगाब्द 5127 | 11.08.2025

भारत माता जिनके हृदय सिंहासन पर विराजमान थी, मातृभूमि की स्वतंत्रता जिनके जीवन का उद्देश्य था, जिन्होंने मन:पूर्वक अपनी वाचा, वाणी, कलम मातृभूमि के लिए समर्पित की थी ऐसे अद्वितीय स्वातंत्र्य सेनानी, हिंदु संघटक, प्रतिभावान महाकवि, विज्ञान निष्ठ समाज सुधारक, नाटककार आदि गुणों से अलंकृत, मृत्युंजय स्वातंत्र्यवीर सावरकर भरतभू के युगपुरुष थे। उनके व्यक्तित्व का एक एक गुण सावरकर महापर्व का विषय बिंदु हो सकता है।

स्व. बाळाराव सावरकर के द्वारा लिखित सावरकर पर्व के खंडों का संस्कृत भाषानुवाद प्रकाशित करने का स्वातंत्र्य वीर सावरकर राष्ट्रीय स्मारक का मनोदय परमसुखद समाचार है। विदुषी डॉ. मंजूषा कुलकर्णी ने संस्कृत भाषांतर का महती कार्य संपन्न किया तदर्थ उनका हार्दिक अभिनंदन। विश्व मोहिनी श्री शारदा के कृपा प्रसाद व अनुग्रह से यह साहित्य सेवा की संपूर्ण सफलता हेतु अनेक मंगल कामनाएं।

मोहन भागवत

राष्ट्रियसंस्कृतविश्वविद्यालयः, तिरुपतिः
National Sanskrit University
A Central University established by an Act of Parliament
(Formerly Rashtriya Sanskrit Vidyapeetha, Deemed to be University)
Tirupati - 517 507

Prof. Harekrishna Satapathy
Former Vice-Chancellor

Date - 15th Aug 2025

पुरोवाक्

अतीव हर्षप्रकर्षस्य विषयः यत् स्वातन्त्र्यवीर-विनायक-दामोदर-सावरकरमहोदयस्य जीवनवृत्तान्तमाधारीकृत्य तस्य स्वीयसहायक-दिवंगत-आचार्य-बालाराव-सावरकरमहोदयेन मराठीभाषायां विरचितस्य " सावरकर पर्व " नामधेयस्य प्रसिद्धपुस्तकस्य संस्कृतानुवादः केन्द्रसाहित्य-अकादमीपुरस्कारप्राप्त-विशिष्टसंस्कृतविदुषी-डाक्टर-मञ्जूषा- कुलकर्णीमहोदयया कृतः । यद्यपि ग्रन्थोऽयं भागचतुष्टयेन विभक्तः, तथापि सम्प्रति तस्य "स्वातन्त्र्यवीरः सावरकरः रत्नगिरिपर्व " इत्याख्यस्य भागस्य प्रकाशनं क्रियते ।

संस्कृतम् एका विश्वभाषा । विश्वस्य बहुभिः प्रसिद्धाभिः भाषाभिः सह प्रायशः सर्वप्राचीनायाः अस्याः संस्कृतभाषायाः सम्पर्कः विद्यते । सर्वाषां भारतीयभाषाणाम् इयं प्राचीना संस्कृतभाषाऽपि जननी अस्ति । इयं न केवलं एका भाषा; अपि तु वेद-वेदान्तोपनिषत्-महोकाव्य-धर्मशास्त्र-अर्थशास्त्र-पुराणादिषु लिपिबद्धा इयं सम्पूर्णभारतवर्षस्य ज्ञानविज्ञानप्रयुक्तिविद्यापरम्परायाः तथा भारतीयसनातनहिन्दुत्व-विचारधारायाः परिप्रकाशिका।

स्वातन्त्र्यवीरः युगपुरुषः युगस्रष्टा सुमहान् विद्वान् यद्यपि महाराष्ट्रीयः आसीत्, तथापि स सर्वदा जातीयचेतनया उद्बुद्धः सन् समग्रं भारतवर्षमेकं हिन्दूराष्ट्ररूपेण समग्रेविश्वे उपस्थापयितुं आजीवनं बौद्धिकं संग्रामं कृतवान् । अतः मराठीभाषायां लिखितस्य मूलग्रन्थस्य संस्कृतानुवादद्वारा न केवलं विश्वं सावरकरजीवनवृत्तान्तेन सह परिचितं भविष्यति; अपि तु भारतमातुः योग्यतमसन्तानस्य स्वातन्त्र्यवीरसावरकरस्य आत्मा सानन्दं वैकुण्ठे परमात्मना सार्द्धं सम्मीलितः सन् सानन्दमस्मभ्यमाशीर्वचनं प्रदास्यति ।

वीरः सावरकरः न केवलं अप्रतिमवीरत्वस्य वा तुङ्गव्यक्तित्वस्य वा असीमविद्वत्तायाः वा अनुपमवैचारिकवैभवस्य एकः आदर्शः महापुरुषः आसीत्; अपि तु सः स्वीयमातृभूमेः भारतवर्षस्य एकताऽखण्डतासंरक्षणार्थमेव उत्सर्गीकृतप्राणः तथा अप्रतिमः राष्ट्रभक्तः आसीत्। तत्कालीनब्रिटिशशासनस्य उच्छेदनार्थं तथा भारतवर्षस्य स्वतन्त्रातार्थं वीरसावरकरमहोदयेन यः संग्रामः कृतः; स अविस्मरणीयः । तदर्थं ब्रिटिशजनैः सः कारारुद्धः कारितः; मानसिकदृष्ट्याऽपि बहु प्रताड़ितः । तथापि तस्य उत्साहस्य वा वीरत्वस्य अवसानं नाऽभूत्। देशप्रेम्णः बन्हिः सर्वदा तस्य अन्तःकरणे प्रज्ज्वलितः आसीत् । तस्य स्वीयसहायकः आचार्यः बालराव सावरकरः वीरसावरकरमहादयानामेतेषां वीरत्वव्यञ्जकानां सर्वेषां कार्य्याणां साक्षी आसीत् । अतः तेन यत् पुस्तकं विरचितं, तत् अवश्यं सर्वेषां विश्वासयोग्यं प्रामाणिकञ्च । एतदर्थं अनुवादिकायाः डक्टर मञ्जुषाकुलकर्णीमहोदयायाः कृते बहुशः सश्रद्धमान्तरिकाभिनन्दनानि निवेद्यन्ते।

आचार्या डक्टर मञ्जूषा कुलकर्णी (एम.ए, एम्.एड्, पी एचडी, सेट, नेट) न केवलं महाराष्ट्रस्य सुप्रसिद्धा विदुषी; अपि तु समग्र भारतवर्षस्य विशेषतः समग्र संस्कृतवाङ्मये एका सर्वविदिता महीयसी सारस्वतसाधिका विद्यते। सा एकाधारेण कवयित्री, लेखिका, कथावाचिका, सुशासिका, अध्यापिका तथा सर्वोत्कृष्टोपस्थापिका । तया शताधिकानि पुस्तकानि संस्कृत-मराठी-हिन्दी-ईंराजी-प्रभृतिभाषाभिः लिखितानि । **मञ्जूषायाः संस्कृतानुवादशैली स्वच्छसलिला कलकलरवान्विता जाह्नवीव प्रवहमाना दृश्यते** । भाषायां यथा माधुर्य्यं तथैव भावेऽपि गाम्भीर्य्यम् । एतदेव मञ्जूषायाः विशेषत्वम्। अतः अतः पुनरेकवारं ताभ्यः महोदयाभ्यः एतादृशसारस्वतकार्यस्य कृते अभिनन्दनानि कृतज्ञताश्चच विनिवेदयामि ।

एतत्-संस्कृतानुवाद-माध्यमेन न केवलं संस्कृत-साहित्यं समृद्धं भविष्यति, अपि तु मराठीभाषामजानन्तः भाषान्तराणां संस्कृतविद्वांसः, विदुष्यः, छात्राः, गवेषकाः पाठकाश्च बहुधा अनुप्राणिताः भविष्यन्ति-इत्यत्र नास्ति कश्चित् संशयः । विशेषतः भारतवर्षस्य भविष्यवंशधराः वीरसावरकरमहोदयस्य एतादृशीमैतिहासिकतथ्यसंवलितां गाथां पठित्वा अवश्यमुत्साहिताः भविष्यन्ति। **शिक्षायाः प्रयोजनं भवति बालकानां बालिकानामन्तःकरणेषु उत्साहजागरणं; येन ते स्वकीयशौर्य्य-वीर्य्य-प्रदर्शनपुरःसरमग्रे सरिष्यन्ति** । आशासे; इदमनुवादकपुस्तकमवश्यमस्यां दिशि उपादेयं भविता ।

प्रकाशनसास्य सर्वविधां सफलतां कामायमानः विशिष्टविदुषी-डक्टर मञ्जूषाकुलकर्णी महादयायाः सारस्वतजीवनस्य काव्यिकमार्गः पुनरपि मधुमयः भवतु इति भगवतः गणनायकस्य चरणपङ्कजयोः प्रार्थना।

आचार्य हरेकृष्ण शतपथी

पूर्वकुलपतिः

Formerly VICE-CHANCELLOR- ***S.J.S. UNIVERSITY, PURI & KISS UNIVERSITY BHUBANESWAR***

Presently- ***GUEST PROFESSOR IIT, BHUBANESWAR,***

FLAT NO- 308, ROCK POOL HEIGHT APARTMENT, KISS UNIVERSITY ROAD BHUBANESWAR-24, mob- 8763706695

प्रो. श्रीनिवासः वरखेडी
कुलपतिः
Prof. Shrinivasa Varakhedi
Vice-Chancellor

केन्द्रीयसंस्कृतविश्वविद्यालयः
संसदः अधिनियमेन स्थापितः
Central Sanskrit University
Established by an Act of Parliament

के.सं.वि./कुलपति-101/2025-26//122

दिनाङ्कः –29.07.2025
श्रा. शु. पञ्चमी, वि.सं. 2082

मान्ये मञ्जूषा कुलकर्णी महोदये!
सर्वादौ अभिनन्दनानि भवत्यै।

विदितमेव समेषां यत् संस्कृतज्ञानां सारस्वतकार्याणि त्रिष्वपि कालेषु प्राधान्यं वहन्तीति। तत्रापि वीरसावरकरमहोदयस्य **"वीरचरितं"** तत्रभवती भवती संस्कृतेन अनूद्य ग्रन्थाकारं प्रायच्छत् इत्येषः अभिनवोत्कर्षविशेषः। अतः आदावेव अभिनन्दनानि।

राष्ट्रहिताय कारागारवासमपि विधाय स्वीयं राष्ट्राभिमानं विनायकदामोदरसावरकरवर्यः सर्वसम्मुखं सधैर्यं च प्रादर्शयत्। तदीया जीवनशैली तत्परता राष्ट्रनिष्ठा च अद्यापि भारतीययुवसन्ततिं प्रचोदयति। इतः पूर्वमेव विनायकदामोदरसावरकरवर्यस्य समीपवर्ती बाळाराव सावरकरवर्यः **'सावरकर पर्व'** इत्येनं ग्रन्थविशेषमरचयत्।

खण्डचतुष्टयोपेतस्य अस्य ग्रन्थस्य यथावदनुवादः अधुना चातुर्येण श्रद्धया च भवत्या विहितः। बहुभाषाभाषिभिः संयुक्ते भारते सर्वेषु कोणेषु संस्कृतज्ञाः सन्ति। एते सर्वेऽपि अधुना भवत्याः सारस्वतश्रमेण सावरकरवर्यस्य नैजं जीवनचरितं ससुखं पठितुमर्हन्तीति विशेषः। पारतन्त्र्यं दर्शं दर्शम् अरिभयङ्करः दामोदरः कथमभूदित्यत्र रूपककारोऽपि सुष्ठु चित्रयति। तद्यथा –

खदिराङ्गारो नेत्रयोरभूत्
फुरफुरायते बाहुयुगम्।
वीरो दामोदरः प्रस्थितः
कर्तुमुद्यतः खलदमनम्।।

एवमस्य महापुरुषस्य सविस्तरं वर्णनम् अधुना इतोऽपि स्फुटतया जायतयिति मोदामहे।

संस्कृतेन सह हिन्द्यां मराठीभाषायां च तत्रभवती भवती शताधिकान् विरचय्य लब्धयशस्का । साहित्य अकादमी पुरस्कारेण पुरस्कृता भवती शिक्षणे प्रशिक्षणे अनुवादे ग्रन्थलेखने प्राशासनिककार्येष्वपि सिद्धहस्ता इति सारस्वतसमाजः सानन्दं वक्ति। अधुना महाराष्ट्रराज्यस्य मुख्यमन्त्रिणः सचिवालये प्राशासनिकाधिकारिरूपेण सेवारता भवती व्यस्तायां सत्यामपि संस्कृतकार्येषु कार्यक्रमेषु च सोत्साहम् आत्मानं विनियोजयतीत्यतः पुनरपि अभिनन्दनकुसुमाञ्जलिः।

जयतु संस्कृतम्।

श्रीवर०

(आचार्यः श्रीनिवासः वरखेडी)
कुलपतिः

56-57, सांस्थानिक क्षेत्र, जनकपुरी, नई दिल्ली-110058 (भारत)
56-57, Institutional Area, Janakpuri, New Delhi-110058 (INDIA)
(O) 011-28523949 www.sanskrit.nic.in
vc@sanskrit.ac.in / vicechancellor@csu.co.in

प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई

अध्यक्ष/विश्वस्तः – डॉ. सरोजा भाटे

शुभाशंसनम् ।

महत् खल्विदं प्रमोदस्य आस्पदं यत् मम प्रियसख्या विदुष्या मञ्जूषा-कुलकर्णीमहोदयया स्वातन्त्र्यवीराणां सावरकराणां चरितं गीर्वाणवाण्याम् अनूदितम् इति । चरितस्यास्य प्रथमः खण्डः रत्नागिरिपर्वाख्यः अचिरादेव प्रकाश्यते इति महते हर्षाय कल्पते वृत्तमिदम् । एकतः जाज्वल्यमानायाः राष्ट्रभक्तेः देदीप्यमानं प्रतीकम् अपरतश्च साक्षात् 'शारदातनया' देववाणीप्रिया एतयोः रमणीयं मेलनमिदं 'रत्नं समागच्छतु काञ्चनेन' इतीमां पङ्क्तिं स्मारयति । दिष्ट्या वर्धते प्रज्ञाप्रतिभामञ्जूषा मञ्जूषा अनेन अनितरसाधारणेन उपक्रमेण । वीरसावरकरचरितस्पर्शेन पुनातु संस्कृतभारती इति अजस्रं शुभाशंसनम् ।

सरोजा भाटे

सरोजा भाटे

वसुधैव कुटुम्बकम्
INTERNATIONAL ASSOCIATION OF SANSKRIT STUDIES
अन्ताराष्ट्रियसंस्कृताध्ययनसमवायः

प्रो०दीप्ति शर्मा त्रिपाठी, पीएच०डी०
राष्ट्रपति-सम्मानित
अध्यक्ष, अन्ताराष्ट्रिय संस्कृत अध्ययन समवाय, पेरिस
पूर्वाध्यक्ष, संस्कृत विभाग
दिल्ली विश्वविद्यालय
पूर्वनिदेशक, राष्ट्रीय पाण्डुलिपि मिशन
संस्कृति मन्त्रालय, भारत सरकार

निवास
बोधिदीप, ई 2325
पालम विहार
गुरुग्राम 122017

दिनांक:15.08.2025

शुभाशंसा

डॉ॰ मञ्जूषा कुलकर्णी उन विरल व्यक्तित्वों में हैं जो प्रशासन के साथ साहित्य-सेवा में अहर्निश सक्रियता से संलग्न रहती हैं। आज के इस युग में जब छोटे-बड़े सभी समयाभाव का रोना रोते रहते हैं, वे न केवल महाराष्ट्र के मुख्यमन्त्री कार्यालय में प्रशासकीय अधिकारी का कार्यभार कुशलतापूर्वक निर्वहण करती हैं अपितु उसके साथ साहित्य की विभिन्न विधाओं में उच्च कोटि की रचना भी नियमित रूप से करती रहती हैं। वे बहुभाषाविद् हैं। मातृभाषा मराठी के साथ संस्कृत, हिन्दी एवं अंगरेजी में उनकी समान गति है। इसी कारण से वे संस्कृत के साथ-साथ अन्य भाषाओं में अनुवाद तथा मौलिक रचनाओं से निरन्तर साहित्य की श्रीवृद्धि करती रहती हैं। अब तक संस्कृत, हिन्दी तथा मराठी भाषाओं में शताधिक पुस्तकों का प्रकाशन करने का महनीय कार्य करने के साथ किसी एक विषय के ऊपर पूरा काव्यसंग्रह प्रकाशित करने का विशिष्ट कार्य करने का श्रेय भी आपको प्राप्त है। विषयों का चयन मञ्जूषाजी की सहृदयता के साथ उनके प्रकृतिप्रेम का भी परिचायक है। इसके उदाहरण के रूप में कतिपय विषय, जो इनकी रचनाधर्मिता को उजागर कर चुके हैं, इस प्रकार हैं, फूल,सुबह, शाम, धरती, अम्बर, निसर्ग आदि।

डॉ॰ प्रकाश आमटे के चरित्र का संस्कृत में अनुवाद कर साहित्य अकादमी पुरस्कार पाने वाली प्रथम महाराष्ट्री विदुषी होने का गौरव मञ्जूषाजी को प्राप्त है। इसके साथ ही मराठी काव्यक्षेत्र में विश्वविक्रम के सम्मान से भी आप सम्मानित हो चुकी हैं। इस प्रकार की विशिष्ट प्रतिभा की धनी डॉ॰ मञ्जूषा कुलकर्णी के द्वारा किया गया 'सावरकर पर्व' के रत्नागिरि पर्वखण्ड का संस्कृत में अनुवाद निश्चय ही उनके यश में और भी श्रीवृद्धि करेगा। मेरी शुभकामना है कि अपनी कारयित्री एवं भावयित्री प्रतिभा के द्वारा साहित्य के क्षेत्र में वे देशव्यापी स्थायी यश को प्राप्त करें।

D.Tripathi
दीप्ति शर्मा त्रिपाठी

सत्यमेव जयते

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

जा.क्र/मु.मं.स/ज.क./२१६/२०२५
दि. १९ ऑगस्ट, २०२५

शुभेच्छा

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या अद्वितीय कार्याविषयी आणि जीवनाविषयी आचार्य बाळाराव सावरकर यांनी लिहिलेला 'सावरकर पर्व' हा ऐतिहासिक ग्रंथ आता संस्कृत भाषेत प्रकाशित होत आहे, याचा मला विशेष आनंद आहे.

आधुनिक विचार मांडत भारत जगातील सर्वश्रेष्ठ देश झाला पाहिजे; आपल्या ज्ञानाचा, कर्तृत्वाचा मातृभूमीच्या विकासासाठीच उपयोग झाला पाहिजे, असे विचार मांडणारे आणि ते विचार प्रत्यक्षात जगणारे स्वातंत्र्यवीर सावरकर कायम प्रेरणा देत राहिले आहेत. 'त्याग' या शब्दाचे मूर्त स्वरूप म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर. हातात धगधगता निखारा घेऊन राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांचे विचार दीपस्तंभासारखे आहेत. या विचारांचा जागर होणे आवश्यक असून हा ग्रंथ त्यादृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, अशी खात्री वाटते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे राष्ट्रनिष्ठ व्यक्तिमत्त्व, प्रखर विचार, अथक संघर्ष व त्यांची युगपुरुष म्हणून असलेली भूमिका या ग्रंथामध्ये अत्यंत नेमकेपणाने आणि प्रभावीपणे साकारलेली आहे. हा ग्रंथ निश्चितच भावी पिढीसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल. यानिमित्त ग्रंथाच्या अनुवादक डॉ. मंजूषा कुलकर्णी व प्रकाशक स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक संस्थेचे हार्दिक अभिनंदन!

'सावरकर पर्व' ग्रंथाच्या प्रकाशनास मन:पूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, **ई-मेल :** cm@maharashtra.gov.in,
वेब साईट : www.maharashtra.gov.in

|| श्रीहरि: ||

स्वामी गोविन्ददेव गिरि

आचार्य- डी.लिट्. (मानद)

उपाध्यक्ष, श्रीकृष्ण जन्मभूमि ट्रस्ट, मथुरा

कोषाध्यक्ष, श्रीरामजन्मभूमि तीर्थक्षेत्र (न्यास), अयोध्या

'धर्मश्री', सूर्यमुखी दत्तमंदिर के समीप,
पुणे विद्यापीठ मार्ग, पुणे ४११०१६
दूरभाष : (०२०) २५६५२५८९
फॅक्स : (०२०) २५६७२०६९
swamigovindgiriji@gmail.com

शुभकामना

हम सभी भारतीय वास्तव में अतीव भाग्यशाली हैं कि अलौकिक विभूति परमादरणीय स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरजी का प्राकट्य इस देशमें हुआ। उत्कट देशप्रेम, बहुमुखी-प्रतिभा, मातृभूमि के चरणों में स-परिवार सर्वस्व समर्पण, क्रान्तदर्शिता एवं आमरणान्त स्वदेशहितचिंतन आदि अनगिनत सद्गुणों का समुच्चय एकही व्यक्ति में उनके सिवा मुझे तो अन्यत्र दिखाई नहीं देता।

स्वातंत्र्यवीर सावरकरजी का जीवन, कार्य एवं विचार अभिन्न हैं। उनका देह तो उनके विचार एवं कार्य का मूर्त रूप था। अतः देह से विलुप्त हो जानेपर भी आप इतिहास नहीं हुए। आज भी वर्तमान हैं, पहले से भी अधिक प्रस्तुत हैं, होते जा रहे हैं।

इस दृष्टि से इस कालजयी विभूति के जीवन के सभी पहलुओं को ग्रंथरूप से चिरंजीवी करने का महत्त्वपूर्ण परंतु दुष्कर महत्कार्य स्व. बाळाराव जी सावरकरने किया इसलिए परवर्ती पीढ़ियाँ उनकी सदा ऋणी रहेंगी।

परंतु स्वातंत्र्यवीर सावरकरजी का विचारधन किसी एक भाषा की विरासत नहीं है। सभी भाषा-भाषियों का उसपर उतना ही अधिकार है जितना मराठी भाषियोंका। अतः देशव्यापी प्रसार हेतु उसका अनुवाद होना भी अत्यंत आवश्यक था।

*ऐसेमें मैं यह देखकर अतीव आनंदित हुआ कि सुविख्यात विदुषी, बहुभाषाकोविद तथा वक्तृत्व, काव्य, ग्रंथलेखनादि विविध रूपों से, भारतीय संस्कृतिकी सेवा में समर्पित डॉ. श्रीमती मंजूषा कुलकर्णी ने **'सावरकर पर्व'** का संस्कृत में अनुवाद कर मानों अन्य भारतीय भाषाओं में अनुवाद का महाद्वार ही खोल दिया है। उनका भूरि भूरि सधन्यवाद हार्दिक अभिनंदन!*

*स्वातंत्र्यवीर सावरकरजी को न केवल सम्यक् रूपसे जानने-माननेवाले, अपितु उन्हीं के पदचिह्नोंका अनुसरण करनेवाले, उनके सपनों का भारत प्रत्यक्ष में उतारने हेतु कटिबद्ध हमारे प्रिय प्रधानमंत्री मा. श्री. नरेन्द्रजी मोदी के समर्थ करकमलों द्वारा इस संस्कृत संस्करणका प्रकाशन होना यह तो मणिकांचन योग है। मुझे विश्वास है कि भारतीय राष्ट्रविचार के इतिहास के अंकन में **'सावरकर पर्व'** का वही स्थान सिद्ध होगा जो महाभारत में **'भीष्मपर्व'** का।*

*इस अनमोल योगदान हेतु मैं **'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक'** के सभी पदाधिकारियों का एवं इस महत्कार्य से संबंधित सभीका हृदयपूर्वक अभिनंदन करता हूँ तथा प्रभु श्री रामचंद्र के चरणों में प्रार्थना करता हूँ कि राष्ट्रहितचिंतन की यह ध्वजपताका सदैव अग्रसर रहे! इति!*

आषाढ कृ. ३०
दर्श अमावास्या, गुरुपुष्यामृत
युगाब्द ५१२७
दि.: २४ जुलाई २०२५

भारतमाता के चरणों में समर्पित
स्वामी गोविंददेवगिरि
(स्वामी गोविंददेव गिरि)

| महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान | गीता परिवार | संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुल | श्रीकृष्ण सेवा निधि |

Email : dharmashree123@gmail.com | Website : www.dharmashree.org

लेखिकेचा परिचय

- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४

सध्या :

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित "वैदिक साहित्याचा इतिहास" (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

लक्षणीय योगदान :

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

प्रकाशमार्गा: हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

प्रकाशित पुस्तके –

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्यायः, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा, सुख सुखाचं (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप–स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी, फुललेलं मौन (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन – भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन – भाग २), प्रमिला (धरती–आकाश), लाघव वेळा (सकाळ–संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, क्षणांचं देण, आयुष्याचं गाव (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, दरवळ तुझे नि माझे (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया – कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती–आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी, लोभसवाणी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना, मल्मली, अक्षरा, अनुरंग, नवी नवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, (मिश्र कविता) मन मनुल्या (मन), निरव नमन (अध्यात्म), यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात – डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये ‘मंजु मंजिरी’ आणि ‘सर्ग निसर्ग’ नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –

(मन) – वेध मनाचा, शब्द पाखरं, मन मोहरून माझे, (निसर्ग) – पानापानातली कथा, (प्रीत त्याची तिच्यासाठी) – शब्द तुझ्या नावाचे, (पशु–पक्षी – घरटे) स्पंदन रेषा, (सुख–दुःख) – सुखाचा किनारा, (नाती) – थांब जरा तू, (गंध–सुगंध) – दूर त्या तिथे, आनंद गंधपाणी, (स्त्रीजीवन) – उडण्या हे आभाळ, (चंद्र आणि लज्जा या भावनांवरील कविता) – घडते नवेच काही. (संस्कृत बाल काव्यसंग्रह) – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, (संस्कृत अनुवाद) – मनुष्यः.

मिळालेले पुरस्कार :

पुरस्काराचे नाव आणि वर्ष –

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२१
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

अ.क्र.	तपशील	लिंक
१	सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४	https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe
२	सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार	https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons
३	''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर.	https://youtu.be/Lqu-YF4G-rw
४	डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार	https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/

५	महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट	<https://twitter.com/mah a_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/mah a_governor/status/143955 9859536482304?s=08
६	संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:'	https://www.loksatta.com //lokrang/sahitya- akademi-award-for- translation-autobiography- of-prakash- amte-poet-prof-dr- manjusha-kulkarni- prakashwata-zws- 70-2612674/lite/ ?utm_source=whatsapp_ web&utm_medium=social& utm_campaign=socials harebuttons
७	https://mr.wikipedi a.org	https://mr.wikipedia.org/ wiki/मंजूषा_कुलकर्णी
८	प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार	https://youtu.be/ 6x7BRzz_seo

९	प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे)	https://youtu.be/7a5dNUZKnRk
१०	@MahaGovtMic	https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08
११	कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी	https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20
१२	साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई	https://youtu.be/VEJcY4GX7tg
१३	सखी सह्याद्री	<https://youtu.be/IT LxInwuJc ; https:/ youtu.be/7a5dNUZKnRk
१४	खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया	https://youtu.be/m1Ot_LzxI4k

१५	मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट	https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653335052919&id=100015176343763&sfnsn=wiwspwa
१६	संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट	https://m.facebook.com/story.php?story_fbid= 4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa
१७	ऑडिओ अल्बम - ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम - ''मंजुमंजिरी''	<https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5
१८	Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan	https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q
१९	स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग - १	https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared
२०	स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग -२	https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT

सारांश :

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ११७
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : १५
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •